सत्यमेव जयते

# क्षेत्र अधिकाऱ्यासाठी निदेशपुस्तिका
# २०२३

## भारत निवडणूक आयोग

**निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१**

**" एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये "**

(हा दस्ता ऐवज भारत निवडणुक आयोगाच्या https://eci.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.)

(दस्ताऐवज क्रमांक ३२४.६. ईपीएस : एच. बी. : ७ : २०२३)




भारत निर्वाचन आयोग

**Election Commission of India**

Nirvachan Sadan, Ashoka Road, New Delhi-110001

# क्षेत्र अधिकाऱ्यासाठी निदेशपुस्तिका
# २०२३

## भारत निवडणूक आयोग

### निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

### " एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये "

(हा दस्ता ऐवज भारत निवडणुक आयोगाच्या https://eci.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.)

(दस्ताऐवज क्रमांक ३२४.६. ईपीएस : एच. बी. : ७ : २०२३)

वाय १९१८—१

## अनुक्रमणिका


| प्रकरण/प्रारंभिक (१) | | पृष्ठ क्रमांक (२) |
|---|---|---|
| | **प्रकरण — ०१, प्रारंभिक** | १ |
| | **प्रकरण — ०२, क्षेत्र अधिकाऱ्याची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या** | ३ |
| २.१ | आढावा | ३ |
| २.२ | मतदानपूर्व जबाबदाऱ्या | ३ |
| २.३ | मतदानाच्या दिवशीची जबाबदारी | ५ |
| २.४ | मतदानोत्तर जबाबदारी | १० |
| | **प्रकरण — ०३, असुरक्षिततेचे मापन आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्र** | |
| ३.१ | प्रस्तावना | १२ |
| ३.२ | वैधानिक चौकट | १२ |
| ३.३ | असुरक्षिततेचे मापदंड | १२ |
| ३.४ | असुरक्षितता मापन (व्हीएम) सरावाचे तीन टप्पे | १३ |
| ३.५ | असुरक्षित क्षेत्र/प्रभाग/गावे/वस्त्या निश्चित करणे | १३ |
| ३.६ | अशा असुरक्षिततेस कारणीभूत असणाऱ्या व्यक्ती निश्चित करणे (शोधून काढणे) | १४ |
| ३.७ | निश्चित करण्यात आलेल्या असुरक्षित क्षेत्रांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याच्या उपाययोजना करण्याचे काम क्षेत्र अधिकाऱ्याद्वारे केले जाईल | १४ |
| ३.८ | मतदानाच्या दिवशी असुरक्षित क्षेत्र/असुरक्षित व्यक्तींचे संनियंत्रण कृती | १४ |
| ३.९ | जबाबदारी व उत्तरदायित्व | १६ |
| ३.१० | अतिसंवेदनशील मतदान केंद्र | १६ |
| | **प्रकरण — ०४, अनुपस्थित मतदारांद्वारे टपाली मतपत्रिकेमार्फत मतदान** | |
| | **जोडपत्र -एक ते जोडपत्र — आठ** | १८ |

## संक्षेप

| | |
|---|---|
| ARO | सहायक निवडणूक निर्णय अधिकारी |
| ASD | अनुपस्थित, स्थलांतरित व मयत |
| ASI | सहायक उप निरीक्षक |
| ATR | कृती अहवाल |
| CEO | मुख्य निवडणूक अधिकारी |
| CAPF | केंद्रीय सशस्त्र पोलीस बल |
| DEO | जिल्हा निवडणूक अधिकारी |
| DM | जिल्हा दंडाधिकारी |
| DSP | पोलीस उप अधीक्षक |
| ECI | भारत निवडणूक आयोग |
| EPIC | मतदार छायाचित्र ओळखपत्र |
| LIB | स्थानिक गुप्तचर विभाग |
| LOR | कायदा व सुव्यवस्था |
| LWE | डावी कडवी विचारसरणी |
| MCC | आदर्श आचार संहिता |
| NBW | अजामीनपात्र वॉरंट |
| PASA | जातीय, समाजविरोधी व इतर विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम |
| PCCP | गस्त -नि- संकलन पथक |
| PI | पोलीस निरीक्षक |
| PS | मतदान केंद्र |
| RO | निवडणूक निर्णय अधिकारी |
| SDM | उप विभागीय दंडाधिकारी |
| SDPOs | उप विभागीय पोलीस अधिकारी |
| S. O. | क्षेत्र अधिकारी |
| SP | पोलीस अधीक्षक |
| TDO | तालुका विकास अधिकारी |
| UT | संघ राज्यक्षेत्र |
| VM | संवेदनशील क्षेत्र निश्चित करणे |

## प्रकरण ०१

## (प्रारंभिक)

**१.१** क्षेत्र अधिकारी/क्षेत्रीय दंडाधिकारी निवडणूक व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका बजावतात आणि मतदान केंद्राध्यक्ष/मतदान पथक, निवडणूक निर्णय अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्यातील दुवा म्हणून काम करतात. क्षेत्र अधिकारी, निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाल्याच्या दिवसापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निवडणूक व्यवस्थापनाकरिता जबाबदार असतो. प्रत्येक क्षेत्र अधिकाऱ्याकडे सहसा १०-१२ मतदान ठिकाणांची जबाबदारी असते. सामान्यतः राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांमधून जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांद्वारे क्षेत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. आवश्यकता असल्यास, केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांचीही नियुक्ती केली जाऊ शकते. मतदान पूर्व, मतदानाचा दिवस व निवडणुकीनंतर विविध कामांमध्ये त्यांना पार पाडावी लागणारी महत्त्वाची आवश्यक भूमिका व जबाबदाऱ्या लक्षात घेऊन (मतदानाच्या दिनांकाच्या ४ महिने अगोदर पुरेशा अगोदर) त्यांची नेमणूक केली जाते.

**१.२** क्षेत्र अधिकाऱ्यांना, १०-१२ मतदान केंद्र/ठिकाणांचा समावेश असणारे व्यवस्थापित मार्ग असणारा मतदारसंघाचे विभागाचे एक क्षेत्र सोपविले जाते. क्षेत्र अधिकारी, १ ते २ तासात क्षेत्रामधील सर्व मतदान केंद्रांवर/ठिकाणांवर पोहचू शकतील अशा प्रकारे आधीच क्षेत्रे तयार केली जातील. मतदान केंद्रांचे/ठिकाणांचे मार्ग क्षेत्र नकाशावर रेखाटले जातात आणि क्षेत्र नकाशा देखील मतदारसंघाच्या नकाशावर रेखाटला जातो. त्यांच्या नियुक्तीनंतर लगेचच क्षेत्र अधिकाऱ्यांना क्षेत्र नकाशा तसेच मतदारसंघाचा नकाशा दिला जातो.

**१.३** क्षेत्र पातळीवर खेळते वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी पुरेशा उपाययोजना केल्या जातील आणि मतदारांना भयमुक्त किंवा पक्षपात न करता, मतदान करण्यासाठी अनुकूल वातावरण तयार व्हावे यासाठी विहित केलेल्या निकषांनुसार असुरक्षित वस्त्या व मतदारांची शोधून काढण्याचे काम क्षेत्र अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आले आहे.

**१.४** मतदानाच्या किमान ७ दिवस अगोदर क्षेत्र अधिकाऱ्याला विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांचे अधिकार दिले जातील. क्षेत्र अधिकाऱ्याला त्याच्या अधिकारक्षेत्रातील प्रत्येक कानाकोपऱ्याची म्हणजेच मतदानाची ठिकाणे तसेच मतदान केंद्रांच्या जलग्रहण क्षेत्राची त्याला स्वतःला सविस्तर ओळख झाली पाहिजे.

**१.५** तसेच निवडणूक प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवर क्षेत्र अधिकाऱ्यांना त्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्यांची त्यांना स्वतःला माहिती असणे आवश्यक आहे :

- निवडणूकपूर्व जबाबदारी : मतदान केंद्राचे ठिकाण व मार्गाचे नकाशे यांची पडताळणी, मतदान केंद्रामध्ये किमान सुविधा व पायाभूत सुविधांची हमी, मतदार जाणीव जागृती व असुरक्षिततेच्या मापनाचा नकाशा तयार करण्याचा उपक्रम, इत्यादी
- निवडणूकीच्या पूर्वसंध्येची जबाबदारी : मतदान पथक, निवडणूक साहित्य, सुरक्षा कर्मचारी वर्ग यांची उपलब्धता यांची सुनिश्चिती करणे आणि आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी करणे, इत्यादी.
- मतदानाच्या दिवसाची जबाबदारी : मतदान पथकांना सहाय्य करणे, आवश्यकता असल्यास, ई व्हीएम व व्हीव्हीपॅट बदलणे, उपस्थित मतदारांची टक्केवारी व घडलेल्या घटनांसह विविध अहवाल वेळोवेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना पाठविणे, विहित केलेल्या जा-ये करण्याच्या आराखड्यानुसार, ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यांच्यासह मतदान पथके जातील व परत येतील याची सुनिश्चिती करणे, इत्यादी.

**१.६** मतदारांमध्ये ईव्हीएम / व्हीव्हीपॅट यांविषयी जनजागृती करणे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील मतदारांना त्यांच्या मतदान छायाचित्र ओळखपत्र (ईपीआयसी) याच्या व्यापक कार्यक्रमाविषयी माहिती देणे, मतदारांना हेल्पलाईन क्रमांक आणि ते ज्या ठिकाणी मतदान करणार आहेत, त्या मतदान केंद्रांच्या ठिकाणाची माहिती देणे, ही देखील क्षेत्र अधिकाऱ्याची जबाबदारी आहे. क्षेत्र अधिकारी, हा मतदार माहिती पावतीच्या वितरणाची आणि काही विसंगती असल्यास अहवालाची देखील तपासणी करतील.

**१.७** क्षेत्र अधिकारी, मतदान पथक आणि सर्व निवडणूक साहित्य/उपकरणे सुरक्षितपणे मतदान केंद्रावर पोहचतील याची सुनिश्चिती करेल तो, कोणतेही हरवलेले पथक/पथका मधील हरवलेल्या कोणत्याही सदस्याची माहिती ताबडतोब निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला देईल. मतदान केंद्रावर मतदान पथके पोहोचल्याची माहिती देण्याची जबाबदारी देखील क्षेत्र अधिकाऱ्याची आहे.

**१.८** क्षेत्र अधिकारी मतदानाच्या पहिल्या दोन तासांमध्ये सर्व मतदान केंद्रांना भेट देईल आणि त्यांच्या कार्यक्षेत्रातील मतदान केंद्रांचा अभिरुप मतदान व निवडणूक प्रारंभ अहवाल निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला देईल. क्षेत्र अधिकारी, आवश्यकता असल्यास, ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅट बदलण्याची सुनिश्चिती करेल.

**१.९** क्षेत्र अधिकारी, त्याच्या मतदान केंद्रादरम्यान फिरतो आणि त्याच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक मतदान केंद्राध्यक्षासाठी उपलब्ध असेल/संपर्क साधण्यायोग्य असेल आणि मतदान मुक्त आणि निर्भयपणे आणि विनाअडथळा पार पडेल याची सुनिश्चिती करेल. असुरक्षित भागातील/लोकसंख्येच्या कोणत्याही मतदाराला मतदान केंद्रात येऊन मतदान करण्यात अडथळा येणार नाही, याची दक्षता क्षेत्र अधिकारी घेईल. तसेच, इतर अधिकाऱ्यासह क्षेत्र अधिकाऱ्यांचा मोबाईल क्रमांक मतदान केंद्रावर प्रदर्शित करण्यात येतील.

**१.१०** क्षेत्र अधिकारी, त्यांना नेमून दिलेल्या मतदान केंद्रावर त्यांची कर्तव्य पार पाडण्यासाठी नियुक्त केलेल्या मतदान कर्मचाऱ्यांची काळजी घेतली जाते आणि त्यांना जावक केंद्रावर विनाकारण अडकवून ठेवले जाणार नाही याची सुनिश्चिती करील. क्षेत्र अधिकाऱ्याकडून मतदान कर्मचारी/सुरक्षा दलांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जाईल आणि मतदान केंद्रावर मतदान कर्मचाऱ्यांच्या सुरक्षित आगमनाबाबत पुष्टीकारी अहवाल पाठविल.

**१.११** क्षेत्र अधिकाऱ्यांकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील मतदान केंद्राध्याक्षांनी त्यांच्या दैनंदिनी व्यवस्थित लिहिल्या आहेत की नाहीत याची देखील व्यक्तीशः खात्री करून घेतली जाते. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅट व इतर सांविधिक, असांविधिक कागदपत्रे मतदान केंद्राध्याक्षाकडून प्राप्त केंद्रावर योग्य रीतीने जमा केली आहेत की नाहीत, याची सुनिश्चिती देखील केली जाईल.

**१.१२** क्षेत्र अधिकाऱ्यांच्या कामावर जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी व निरीक्षक यांच्याकडून वारंवार आढावा बैठकींद्वारे आणि अहवालांद्वारे संनियंत्रण ठेवले जाते.

**१.१३** क्षेत्र अधिकाऱ्याने मतदानादरम्यान आवश्यकता भासल्यास, मतदान पथकांना मार्गदर्शन करण्याकरिता मतदान केंद्राध्याक्षाच्या निदेश पुस्तिकेमध्ये वर्णन केलेला मतदान घेण्याच्या प्रक्रियेच्या तपशीलांची माहिती स्वतः करून घेणे आवश्यक आहे. क्षेत्र अधिकाऱ्याने मतदान पथकांसाठी घेतलेले कोणतेही प्रशिक्षण सत्र चुकवू नये आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅट व्यवस्थापनासंदर्भातील नियम-प्रक्रियेबद्दल (प्रोटोकॉलबद्दल) जागरूक असणे आवश्यक आहे.

**१.१४** अशाप्रकारे, निवडणूक सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी क्षेत्र अधिकाऱ्यांना विविध उपक्रम राबवायचे आहेत. या निर्देश पुस्तिकेमध्ये क्षेत्र अधिकाऱ्यांना सोपविण्यात आलेल्या सर्व प्रमुख कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचा समावेश आहे. तथापि, ही परिपूर्ण नाही आणि आयोगाच्या नवीनतम अद्ययावत निदेशांसारखेच ते वाचले पाहिजे.

## प्रकरण ०२

## क्षेत्र अधिकाऱ्याची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

**२.१** आढावा– क्षेत्र अधिकारी हा, मतदान केंद्राध्यक्ष/मतदान पथक निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्यातील एक अत्यावश्यक दुवा आहे. त्यांना क्षेत्र पोलीस अधिकाऱ्यासोबत पुढील बाबींवर संयुक्तपणे प्रशिक्षण दिले जाते आणि प्रशिक्षणादरम्यान त्यांना पुढील तपशील सांगितले जातात, जेणेकरून ते आपली कर्तव्ये सुरळीतपणे पार पाडू शकतील :—

- विभागातील प्रत्येक क्षेत्राच्या मतदाराशी संपर्क साधता यावा यासाठी खेड्याचे नाव, इत्यादींसह प्रत्येक मतदान केंद्राची मतदार यादी.
- मतदान केंद्रनिहाय किमान आश्वासित सुविधा (अलिकडे अद्ययावत)
- वास्तविक मतदार संख्या (मागील दोन सार्वत्रिक निवडणुकांमधील केलेला)
- मतदार लिंग गुणोत्तर
- आदर्श आचार संहितेच्या उल्लंघनाची प्रकरणे (मागील दोन सार्वत्रिक निवडणुकांमधील)
- त्यांच्या क्षेत्रामध्ये येणाऱ्या मतदान केंद्रांची विस्तृत आराखडा आणि स्थान दर्शविणारा, त्यांना सोपविलेल्या ठिकाणाचा मार्ग नकाशा.
- जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने तयार केलेला असुरक्षिततेचे मापन-१(व्हीएम-१) अहवाल (जोडपत्र-एक).

**क्षेत्र अधिकाऱ्याच्या मतदानपूर्व, मतदानदरम्यान व मतदानानंतरच्या विविध जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे आहेत :**

### २.२ मतदानपूर्व जबाबदाऱ्या

**२.२.१** क्षेत्र अधिकाऱ्याने, नकाशावर आखलेला मार्ग नावेने जाण्यायोग्य आहे की नाही याची पडताळणी करावी, नेमून दिलेल्या मार्गाने मतदान स्थळांना प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर पी-३ मतदान केंद्रांसह सर्व मतदान केंद्रांचा संपर्क व प्रवेशक्षमता (रस्ता, पूल, भुयारी गटार), निश्चित करावी आणि आवश्यकता भासल्यास, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला बदल सुचवावे.

**२.२.२** क्षेत्र अधिकाऱ्यानी, त्याच्या नवीन मतदान केंद्रांच्या अधिसूचनेनंतर, नवीन मतदान केंद्रांना व्यापक प्रसिद्धी दिली गेली आहे याची खात्री करावी, त्यांनी प्रत्यक्ष पडताळणीद्वारे मतदान केंद्रांवरील पायाभूत सुविधांची व खात्रीशीर किमान सुविधांची खात्री करावी. क्षेत्र अधिकाऱ्याला, मतदान केंद्रांच्या प्रत्यक्ष पडताळणी अहवाल जोडपत्र-सात मध्ये सादर करावयाचा आहे.

**२.२.३** क्षेत्र अधिकारी, मतदान पथकांचे मोबाईल क्रमांक घेईल आणि मतदान केंद्रावर मोबाईल संपर्क होत असल्याची (कनेक्टिव्हीटी) खात्री करील आणि मतदान केंद्रापासून २०० मीटरच्या आत कोणत्याही राजकीय पक्षाचे/उमेदवारांचे कार्यालय अस्तित्त्वात नाही हे पाहील.

**२.२.४** क्षेत्र अधिकारी, अनधिकृत वाहने व इमारतींचा वापर, मालमत्तेचे विद्रुपीकरण आणि आदर्श आचार संहितेचे कोणतेही संभाव्य उल्लंघन यासारख्या कोणत्याही अनधिकृत मोहिमेच्या कृतींवर लक्ष ठेवेल आणि त्याचा अहवाल देईल.

**२.२.५** क्षेत्र अधिकाऱ्याने, मतदारांना मतदार छायाचित्र ओळखपत्राच्या व्यापक कार्यक्रमाविषयी विशिष्ट माहिती द्यावी आणि पाणलोट क्षेत्रातील मतदारांसाठी राबविण्यात येणाऱ्या फिरत्या इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्राच्या प्रात्यक्षिक कार्यक्रमावर संनियंत्रण ठेवावे, त्यामध्ये सोपविलेल्या सर्व मतदान केंद्रांचा समावेश करावा. क्षेत्र अधिकाऱ्याने, मतदारांना मतदार यादीतील त्यांचे नाव नोंदविण्याच्या कालमर्यादेविषयी माहिती द्यावी, त्यांची नावे व मतदार यादीतील नोंदी त्यांच्या संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याकडून तपासून घ्याव्यात.

**२.२.६** क्षेत्र अधिकाऱ्याला, गुप्त माहिती गोळा करून, विश्वास निर्माण करण्याच्या उपाययोजनांकरिता आणि असुरक्षिततेचे व्यवस्थित मापन करण्याकरिता वारंवार भेटी देणे आणि लोकांशी विस्तृत चर्चा करणे आवश्यक आहे. क्षेत्र अधिकाऱ्याने असुरक्षिततेच्या

मापनासंबंधातील अद्ययावत निदेशांचे पालन करणे आवश्यक आहे. असुरक्षित भागातील मतदारांची गावे, वाड्या, विभाग आणि धमकी देणाऱ्या धाकदपटशा देणाऱ्या व अनुचित प्रभाव टाकणाऱ्या संवेदनशील मतदार घटकांची ओळख सुनिश्चित केली पाहिजे. क्षेत्र अधिकाऱ्याने संवेदनशिलता निर्माण करणाऱ्या घटकाची खात्री करावी आणि अशा प्रत्येक ठिकाणाची/क्षेत्राची माहिती विहित केलेल्या नमुन्यामध्ये स्रोत उघड न करता, त्याच्याकडे एक प्रत ठेवून निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला/जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला स्वतंत्रपणे द्यावी.

**२.२.७** क्षेत्र अधिकाऱ्याने मतदारांना मतदानासाठी विनामुल्य प्रवेशाची सुनिश्चिती करावी आणि संवेदनशील समुदायांमध्ये संपर्काची ठिकाणे स्थापित करावी. क्षेत्र अधिकाऱ्याने असुरक्षित लोकसंख्येमध्ये विश्वास निर्माण करण्याची उपाययोजना म्हणून अशी क्षेत्रे ओळखून तेथे वारंवार भेटी दिल्या पाहिजे आणि त्यांच्या खेड्यांमधील असुरक्षित लोकांच्या बैठकी घेतल्या पाहिजे.

**२.२.८** क्षेत्र अधिकारी, जेव्हा क्षेत्रीय दंडाधिकारी म्हणून काम करतो तेव्हा, तो, मतदान केंद्रांसाठी रेखाचित्र नकाशा (स्केच मॅप), मतदान केंद्रे व निवडणुकीसंबंधातील अधिकारी, पोलीस ठाणे, असामाजिक घटक यांची दूरध्वनी क्रमांकाची/मोबाईल क्रमांकाची यादी यांसह एक क्षेत्रीय दंडाधिकाऱ्याची योजना तयार करील.

**२.२.९** क्षेत्र अधिकाऱ्याने, या प्रयोजनाकरिता, आवश्यकता भासल्यास वाहने, इंधन, मोबाईल फोन इत्यादींची मदत घ्यावी.

**२.२.१०** क्षेत्र अधिकाऱ्याने, राजकीय पक्षाच्या व प्रसारमाध्यमाच्या व्यक्तींशी संवाद साधण्यापासून स्वतःला रोखले पाहिजे आणि निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी व निरीक्षक यांच्या व्यतिरिक्त कोणाजवळही कोणतीही माहिती उघड करू नये.

**२.२.११** क्षेत्र अधिकाऱ्याने, कोणताही उमेदवार किंवा राजकीय पक्षाशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची भेट घेऊ नये किंवा त्यांचे आदरातिथ्य स्वीकारु नये आणि निष्पक्ष राहून पारदर्शकता राखावी.

**२.२.१२ राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅट संबंधात, राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपॅट जमा गोळा करणे.**

निवडणूक निर्णय अधिकारी, राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे आणि नियंत्रण युनिटांच्या अतिरिक्त ऊर्जा संचिके (पॉवर पॅक्स) सह व्हीव्हीपॅट आणि व्हीव्हीपॅट व मतदानाच्या दिवशी बदलण्याकरिता " अभिरुप मतदान बदल" " (मॉक पोल रिप्लेस)" पट्ट्या (स्टीकर्स) पुरवील. क्षेत्र अधिकारी हा, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने ठरवून दिलेल्या वेळेत ते प्राप्त करण्यासाठी निर्धारित संकलन केंद्रावर पोहचेल. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपॅट घेताना, क्षेत्र अधिकाऱ्याने पुढील बाबी तपासल्या पाहिजे **:—**

- " राखीव " चिकटपट्ट्या (विधानसभा निवडणुकांसाठी गुलाबी व संसदीय निवडणुकांसाठी सफेद), मतदान युनिट (युनिटे), नियंत्रण युनिट (युनिटे) व व्हीव्हीपॅट यांच्या वहन पेट्ट्यांवर चिकटविण्यात आल्या आहेत.
- राखीव मत युनिट (युनिटे), नियंत्रण युनिट (युनिटे) व व्हीव्हीपॅट यांचे युनिक आयडी पुरविणे.

**२.२.१३ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (यंत्रे) व व्हीव्हीपॅट (एस) यांच्या वाहतुकीसाठी भौगोलिक स्थान निश्चिती प्रणाली (जीपीएस) ट्रॅकिंग/मोबाईल उपयोजकावर आधारित ट्रॅकिंग असलेल्या वाहनांचा वापर करणे.**

जिल्हा निवडणूक अधिकारी, भौगोलिक स्थान निश्चिती प्रणालीचा (जीपीएस)/मोबाईल उपयोजकावर आधारित ट्रॅकिंगचा सर्व वेळी वापर करून क्षेत्र अधिकाऱ्यांना पुरविलेल्या राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपॅट यांसह इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपॅट घेऊन जाणाऱ्या सर्व वाहनांच्या हालचालीवर शेवटपर्यंत संनियंत्रण ठेवेल आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने, क्षेत्र अधिकाऱ्याच्या नावासह राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपॅट घेऊन जाणाऱ्या सर्व वाहनांचा नोंदणी क्रमांक व तपशील, जिल्ह्यातील सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्य राजकीय पक्ष/उमेदवार आणि निरीक्षक यांना सूचित करणे आवश्यक आहे.

क्षेत्र अधिकारी हा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने/निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने नेमून दिलेल्या वाहनांचाच/इतर वाहतुकीचाच वापर करील. क्षेत्र अधिकारी त्यांना पुरविलेल्या वाहनांमध्ये भौगोलिक स्थान निश्चिती प्रणाली (जीपीएस) ट्रॅकिंग/मोबाईल उपयोजकावर आधारित ट्रॅकिंग प्रणाली बसवलेली आहे याची खात्री करील आणि वाहनासह पोलीस अधिकारी/सुरक्षा व्यक्ती उपलब्ध आहेत याची खात्री करील.

कर्तव्यावर (On Duty)- क्षेत्र अधिकारी/क्षेत्रीय दंडाधिकारी असा मजकूर असणारा स्टीकर वितरणाच्या/मतदानाच्या दिवशी आरक्षित ईव्हीएम/व्हीव्हीपॅट असणाऱ्या वाहनांच्या समोरच्या काचेवर आणि मागच्या काचेवर चिकटवावे. क्षेत्र अधिकाऱ्याला, निवडणुकीच्या प्रयोजनार्थ आवश्यक असल्यास किंवा निर्देशित ठिकाणी सुरक्षित ठेवण्यासाठीच्या कारणांखेरीज इतर कोणत्याही कारणासाठी अधिकृत वाहनातून ईव्हीएम व व्हीव्हीपॅट काढता येणार नाही. पी-३/पी-२/पी-१ (मतदान) दिवसाच्या बाबतीत, क्षेत्र अधिकाऱ्याने आरक्षित ईव्हीएम व व्हीव्हीपॅट, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने चिन्हांकीत केलेल्या मध्यवर्ती सुरक्षित कक्षातच ठेवणे आवश्यक आहे.

**मतदान केंद्रावरील सर्व व्यवस्था**

क्षेत्र अधिकाऱ्याने खात्री करावी की, योजनेनुसार सुरक्षा दल/सुरक्षा कर्मचारी इत्यादीच्या सोबतचा मतदान पथके व निवडणूक संबंधित सर्व साहित्य नेमून दिलेल्या मतदान केंद्रावर पोचले आहे. मतदान प्रक्रिया किंवा ईव्हीएम चालनाबाबत मतदान पथकाला काही शंका असल्यास त्याने त्या सोडविल्या (शंका) पाहिजेत आणि त्याचे स्वतःचे समाधान झाल्यानंतर, ओके असा अहवाल नियंत्रण कक्षाला द्यावा, जर, क्षेत्र अधिकाऱ्याला काही शंका असल्यास, त्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याशी तात्काळ संपर्क साधावा.

क्षेत्र अधिकाऱ्याने, मतदान केंद्राच्या ठिकाणी, चढणीचे-उतरणीचे उतार (रॅम्प), पाणी, स्वच्छतागृहे, दूरध्वनी क्रमांक इत्यादी सारख्या मूलभूत सुविधा व आश्वासित किमान सुविधा असल्याची खात्री करून घ्यावी. क्षेत्र अधिकाऱ्याने, मतदान जेथे होणार आहे अशा मतदान केंद्राच्या जागेवर छप्पर, भिंती, वीज, फर्निचर, मतदान केंद्राच्या आत/बाहेर जाण्याचा मार्ग इत्यादीसारख्या मूलभूत बांधकामाच्या सुविधा असल्याची खात्री करावी.

**२.३ मतदानाच्या दिवशीची जबाबदारी**

**२.३.१ मतदानाच्या दिवशी आरक्षित ईव्हीएम व व्हीव्हीपॅटची ने-आण**

क्षेत्र अधिकारी घेऊन जात असलेल्या आरक्षित ईव्हीएम/व्हीव्हीपॅटवर " आरक्षित " असे योग्य लेबल स्टीकर लावलेले असावे आणि प्रत्यक्ष मतदान सुरु होण्यापूर्वी (अभिरुप मतदानादरम्यान) बदलण्यात आलेली न चालणारी युनिटे मतदान केंद्राध्यक्षाजवळ मतदान केंद्रात ठेवण्यात येऊ नयेत. क्षेत्रीय अधिकाऱ्याने अशी बदलण्यात आलेली युनिटे वहनपेटीवर " अभिरुप मतदानात बदली केलेली युनिटे " असा योग्य स्टीकर लावून परत घेऊन जावे.

जेव्हा जेव्हा मतदान केंद्रातील युनिट(टे) नियंत्रण युनिट ऊर्जा संच (पॉवर पॅक) व व्हीव्हीपॅटचा बदली करतील तेव्हा तेव्हा क्षेत्रीय अधिकाऱ्याने विहित नमुन्यावर (जोडपत्र-दोन) स्वाक्षरी करण्यास विसरु नये.

**२.३.२ नेमून दिलेल्या मतदान केंद्रांना भेट :**

क्षेत्र अधिकाऱ्याची इतर काही कर्तव्ये –

- क्षेत्र अधिकाऱ्याने, जेथे मतदान केंद्रावर मतदान प्रतिनिधींच्या गैरहजेरीत किंवा केवळ एकाच मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत अभिरुप मतदान केले जात असेल तेथे लक्ष द्यावे.
- जेथे आंतरजालावरून प्रक्षेपणाची (वेबकास्टिंगची) व्यवस्था केलेली आहे तेथे आंतरजालावरून प्रक्षेपण (वेबकास्टिंग) व्यवस्थितरीत्या घेतले आहे व कार्यरत असल्याचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मतदान-केंद्र-निहाय प्रमाणपत्र द्यावे.
- अनुदेशांनुसार ४ मतदार सुविधा भित्तिपत्रके (पोस्टर्स) ठळकपणे दिसतील अशी लावल्याची खात्री करावी आणि निवडणूक निर्णय आधिकाऱ्याला त्याचा अहवाल सादर करावा.
- मतदानाच्या दिवशी लांब रांगांचा गतिमान मागोवा घ्यावा.
- मतदान कर्मचारीवर्गाला जबाबदारी सोपविली असल्यास, मोबदला (पारिश्रमिक) दिल्याची खात्री करावी.

**२.३.३ क्षेत्रीय आधिकाऱ्याने मतदान प्रक्रियेचे पावित्र्य (पारदर्शकता)** राखले पाहिजे आणि मतदान केंद्रावर भेटी देताना मतदानाच्या सर्व पैलूंची तपासणी केली पाहिजे आणि मतदानाच्या दिवशी नेमून दिलेल्या सर्व मतदान केंद्रावर किमान तीन वेळा भेटी दिल्या पाहिजेत. किमान एका मतदान केंद्रावर, क्षेत्र अधिकाऱ्याने ईव्हीएमच्या मोहोरेची आणि मतदान पथकांद्वारे तयार करण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी केली पाहिजे.

**२.३.४** राखीव मतदान पथकांतील मतदान कर्मचाऱ्यांच्या बदलीकरिता क्षेत्र अधिकाऱ्याकडे कोणतीही विनंती केली गेल्यास तो, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याशी सल्लामसलत करून त्याबाबत निर्णय घेईल, आणि त्याला नेमून दिलेल्या मतदान केंद्रांच्या संदर्भातील मतदानाच्या दिवशीच्या तक्रारींची दखल घेईल.

**२.३.५** मान्यताप्राप्त पक्षांच्या उमेदवारांच्या प्रतिनिधींची उपस्थिती नसलेल्या आणि जेथे प्रतिनिधींच्या अनुपस्थितीत किंवा केवळ एकाच उमेदवाराच्या केवळ एकाच मतदान प्रतिनिधीच्या उपस्थितीत अभिरूप मतदान घेतले जात असेल अशा मतदान केंद्रांना वारंवार भेटी द्याव्यात.

**२.३.६** क्षेत्र अधिकाऱ्याने मतदान सुरु होण्यापूर्वी अभिरुप मतदानाच्या स्थितीची निश्चिती केली पाहिजे आणि काही समस्या असल्यास, सुधारात्मक कार्यवाही करून समस्या सोडवली पाहिजे. आवश्यकता असल्यास क्षेत्र अधिकाऱ्याने, मतदान केंद्रात मतदान पथकाला प्रक्रियेत सहाय्य केले पाहिजे आणि ३० मिनिटांच्या, आत आभिरुप मतदान स्थितीचा अहवाल निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दिला पाहिजे. क्षेत्रीय अधिकाऱ्याने कोणत्याही विलंबाशिवाय, नेमून दिलेल्या सर्व मतदान केंद्रांवर मतदानाला प्रारंभ झाल्याचा अहवाल निवडणूक निर्णय आधिकाऱ्याकडे दिला पाहिजे.

**२.३.७** क्षेत्र अधिकाऱ्याने मतदान पद्धतीची तपासणी केली पाहिजे आणि जर एखादा मतदारांचा भाग/क्षेत्र त्याच्या (मतदारांच्या) अनुपस्थितीमुळे संशयास्पद वाटल्यास, सुधारात्मक उपाय योजनेसाठी त्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळविले पाहिजे. क्षेत्र अधिकाऱ्याने संवेदनशील वसाहतीतील/समाजातील मतदार मतदानासाठी आले किंवा नाही याची पडताळणी केली पाहिजे. नसल्यास, अशा गोष्टींसाठीच्या समर्पित पथकाला पाठविण्याकरिता निवडणूक निर्णय आधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी याला कळवील.

**२.३.८** मतदानादरम्यान, सूचना दिल्याप्रमाणे, क्षेत्र अधिकाऱ्याने वेळोवेळी मतदानाच्या टक्केवारीचा अहवाल निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला द्यावा आणि मतदान समाप्तीच्या वेळी पुढील गोष्टींची खात्री करावी :-

- मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी योग्यरीत्या भरली आहे.
- इव्हीएम योग्यरीत्या मोहोरबंद केले आहे.
- मतदान प्रतिनिधींना भरलेल्या नमुना १७सी च्या प्रती दिलेल्या आहेत.
- नमुना १७ए मधील मतदार नोंदवही योग्यरित्या भरलेली आहे.
- भारत निवडणूक आयोगाच्या नवीनतम आदेशानुसार कोणताही इतर महत्त्वाचा अहवाल/नमुना.

**२.३.९ ईव्हीएम व व्हीव्हीपॅट करिता बदलीचा प्रोटोकॉल**

ईव्हीएम/व्हीव्हीपॅट अकार्यक्षम असल्यास, पुढील प्रक्रियेचा अवलंब करण्यात येईल.

**अभिरुप मतदानाच्या अकार्यक्षम ईव्हीएम/व्हीव्हीपॅट**

- अकार्यक्षम मतदान युनिट : केवळ मतदान युनिट बदलणे.
- अकार्यक्षम मतदान युनिट : केवळ नियंत्रण युनिट बदलणे.
- अकार्यक्षम व्हीव्हीपॅट : केवळ व्हीव्हीपॅट बदलणे.

**टीप : अभिरुप मतदानादरम्यान बदलण्यात** (Replaced) आलेल्या, नाकारलेल्या (Rejected) मतदान युनिट/ नियंत्रण युनिट/व्हीव्हीपॅट यांच्या वहन पेटीवर **" अभिरूप मतदानादरम्यान बदललेले "** असा लिहिलेला स्टीकर चिकटण्यात यावा आणि कोणत्याही प्रकारची बदली करताना नियंत्रण युनिट (CU) बंद करावे.

**प्रत्यक्ष मतदानादरम्यान ईव्हीएम/व्हीव्हीपॅट अकार्यक्षम होणे.**

**(कोणत्याही प्रकारचा बदल करण्यापूर्वी नियंत्रण युनिट बंद करावे)**

● नियंत्रण युनिट किंवा मतदान युनिट योग्यरीत्या काम करीत नसल्यास पूर्ण संच (म.यु. + नि. यु. + व्हीव्हीपॅट) बदला. पूर्ण संच बदल्यानंतर नोटासहित निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला एक मत देऊन अभिरूप मतदान घ्यावे. (अभिरुप मतदानाच्या सर्व प्रक्रियेचे पालन करावे.)

● जर व्हीव्हीपॅट योग्यरीत्या काम करीत नसेल तर केवळ व्हीव्हीपॅट बदलावा. याबाबतीत, अभिरुप मतदान घेण्याची आवश्यकता नाही.

● जर नियंत्रण युनिटवर व्हीव्हीपॅट " लो बॅटरी " (कमी बॅटरी) दाखवत असल्यास व्हीव्हीपॅटचा ऊर्जा संच (पॉवर पॅक) बदलावा.

● जर नियंत्रण युनिटवर नियंत्रण युनिटकरिता " लो बॅटरी " (कमी बॅटरी) दाखवत असल्यास नियंत्रण युनिटचा ऊर्जा संच (पॉवर पॅक) बदलावा या प्रयोजनार्थ मतदान केंद्राध्यक्ष मतदान प्रतिनिधी व क्षेत्र अधिकाऱ्यांच्या उपस्थित नियंत्रण युनिटचा ऊर्जा संच (पॉवर पॅक) बदली करील आणि पत्त्याच्या खूणचिठ्ठीसह नियंत्रण युनिटचा बॅटरी विभाग पुन्हा मोहोरबंद करील आणि त्यांचे मतदान प्रतिनिधी व क्षेत्रीय अधिकाऱ्याच्या स्वाक्षरी त्यावर घेईल. मतदान केंद्राध्यक्ष विहित नमुन्यातील नमुना अहवाल सादर करील. क्षेत्रीय अधिकारी खाली नमूद केल्याप्रमाणे मतदान प्रक्रियेची माहिती करून घेईलः

**क) अभिरुप मतदान घेणे :**

● अभिरुप मतदान चालू करण्यापूर्वी, मतदान कक्षात मतदान युनिट व व्हीव्हीपॅट ठेवावे आणि नियंत्रण युनिट मतदान केंद्राध्यक्ष/मतदान अधिकाऱ्या (नियंत्रण युनिटचा प्रभारी) जवळ (टेबलावर) ठेवावे. मतदान युनिटची केबल व्हीव्हीपॅटला जोडलेली आणि व्हीव्हीपॅट केबल नियंत्रण युनिटला जोडलेली असावी.

● २ (दोन) किंवा अधिक मतदान प्रतिनिधी मतदान केंद्रावर उपस्थित असल्यास, मतदानाच्या नियोजित वेळेच्या ९० मिनिटे अगोदर अभिरुप मतदान सुरु करावे.

● जर एक किंवा एकही मतदान प्रतिनिधी उपस्थित नसल्यास अभिरुप मतदान सुरु करण्याकरिता १५ मिनिटे वाट बघावी.

● किमान ५० मते द्यावी (नोटासहित प्रत्येक उमेदवाराच्या बटणासाठी मते नोंदली जावी) आणि नियंत्रण युनिटचा निकाल व्हीव्हीपॅट कागदी चिठ्ठ्यांच्या संख्येशी पडताळूण पहावा.

● अभिरुप मतदानाशी संबंधित व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांवर " अभिरुप मतदान चिठ्ठी " असा शिक्का मारावा आणि त्या काळ्या रंगाच्या पाकिटात ठेवून गुलाबी रंगाच्या कागदी चिठ्ठीने मोहोरबंद कराव्यात.

● अभिरुप मतदान घेतल्यानंतर व अभिरुप मतदानाची आधारसामग्री काढून टाकल्यानंतर, नियंत्रण युनिटचा निकाल विभाग हिरव्या रंगाच्या कागदी चिठ्ठीने, विशेष खूणचिठ्ठीने व पत्त्याच्या खूणचिठ्ठीने मोहोरबंद करण्यात यावा आणि व्हीव्हीपॅटचा ड्रॉप बॉक्स पत्त्याच्या खूणचिठ्ठीने मोहोरबंद करावा.

**ख) प्रत्यक्ष मतदान सुरु करणे :**

● अधिसूचित केलेल्या वेळेला प्रत्यक्ष मतदान सुरु करावे.

● पहिल्या मतदाराने नमुना १७ए (मतदार नोंदवही) मध्ये स्वाक्षरी करण्यापूर्वी, मतदान केंद्राध्यक्षासोबत मतदान अधिकारी-एक (नियंत्रण युनिटची) तपासणी करील आणि नमुना १७ए मध्ये " नियंत्रण युनिट तपासले व एकूण शून्य आढळले ". अशी लेखी नोंद करील.

**ग) मतदान समाप्ती :**

● काही अपरिहार्य कारणांमुळे मतदान सुरु करण्यासाठी नियोजित वेळेपेक्षा थोडा उशीर झाला असला तरी देखील मतदान समाप्त करण्याच्या प्रयोजनार्थ निश्चित केलेल्या वेळेवरच मतदान समाप्त करावे.

● याची देखील नोंद घ्यावी की, मतदानाच्या प्रयोजनार्थ निश्चित केलेल्या वेळी मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या सर्व मतदारांनी मतदान केल्याशिवाय मतदान समाप्तीसाठी निश्चित केलेल्या वेळी मतदान समाप्त करता येणार नाही.

● मतदान समाप्त करण्यासाठी, शेवटच्या मतदाराने मतदान केल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष नियंत्रण युनिटवरील; बंद बटण दाबावे. मतदान केंद्राध्यक्षाने, नमुना १७सी च्या भाग एक च्या बाब ६ मध्ये ईव्हीएम मध्ये नोंद झालेल्या मतांच्या एकूण संख्येची नोंद करणे आवश्यक आहे.

● मतदान केंद्राध्यक्षाने, मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीत नियंत्रण युनिटवरील दर्शविलेला मतदान समाप्तीचा दिनांक व वेळेची नोंद करावी.

● निवडणूकीसाठीचे विहित नमुने काळजीपूर्वक व यथोचितरीत्या भरून झाल्यानंतर, मतदान केंद्राध्यक्षाने नियंत्रण युनिट बंद करावे आणि सर्व युनिट म्हणजे मतदान युनिट, नियंत्रण युनिट व व्हीव्हीपॅट अलग करावे आणि पत्त्याची खूण-चिठ्ठी वापरून त्याच्या संबंधित वहनपेटीत ते मोहोबंद करावे. एकाच वेळी होणाऱ्या निवडणुकींच्या बाबतीत, कागदपत्रे स्वतंत्रपणे तयार करावीत आणि (स्वतंत्रपणे) मोहोरबंद करावीत.

● मतदान केंद्राध्यक्ष मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत व्हीव्हीपॅट चा (ऊर्जा संच) (पॉवर पॅक) (बॅटरी) काढील. व्हीव्हीपॅटचा (ऊर्जा संच) पॉवर पॅक (बॅटरी) काढल्यानंतरच मतदान प्रतिनीधींच्या उपस्थितीत व्हीव्हीपीएटीची वहन पेटी मोहोरबंद करावी. व्हीव्हीपॅटचा काढलेला (ऊर्जा संच) (पॉवर पॅक) (बॅटरी) संकलन केंद्रावर जमा करण्यात येईल. हे (ऊर्जा संच) (पावर पॅक) सुरक्षित कक्षात ठेवले जाणार नाहीत.

● मतदान केंद्राध्यक्ष पत्त्याच्या खूणचिठ्ठींवर स्वाक्षरी करील आणि मतदान प्रतिनिधींची सुद्धा स्वाक्षरी घेईल.

**घ) <u>मतदानाच्या दिवशीचा मतदान केंद्राध्यक्षाचा नमुना अहवाल :</u>**

(क) भाग - एक (अभिरुप मतदान प्रमाणपत्र)

(ख) भाग - दोन (नियंत्रण युनिटचा (ऊर्जा संच) (पॉवर पॅक) बदली करणे) : जेव्हा नियंत्रण युनिटचा (ऊर्जा संच) (पॉवर पॅक) बदली केला असेल तेव्हा भरावयाचा.

(ग) भाग - तीन (मतदान प्रमाणपत्र पूर्ण झाल्यानंतर बंद बटण दाबणे) : मतदान पूर्ण (समाप्त) झाल्यानंतर भरावयाचा.

(घ) भाग - चार (जर अभिरुप मतदानादरम्यान बदलला असल्यास, ईव्हीएम/व्हीव्हीपॅटचा बदली अहवाल)

(ड़) भाग - पाच (जर प्रत्यक्ष मतदानादरम्यान बदली केला असल्यास, ईव्हीएम/व्हीव्हीपॅटचा बदली अहवाल)

**टीप :–** अभिरुप मतदानादरम्यान व प्रत्यक्ष मतदानादरम्यान ईव्हीएम व व्हीव्हीपॅट बदली केल्याचा अहवाल क्षेत्र अधिकाऱ्याद्वारे सुद्धा जोडपत्र-चार (मतदान केंद्राध्यक्षाचा अहवाल भाग चार व भाग पाच) या नमुन्यामध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर केला जाईल.

**५) मतदान पूर्ण झाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षाचे काम :**

मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, यथोचितरीत्या भरलेले नमुने व न वापरलेल्या साहित्यासहित इतर साहित्य मतदान केंद्राध्यक्षाने पुढील पाकिटांमध्ये भरून द्यावे जेणेकरुन, संकलन केंद्रावर कोणत्याही अडचणी व चुकी शिवाय ते जमा करता येईल :–

**एक)** पहिल्या पाकिटात पुढे नमूद केल्याप्रमाणे ईव्हीएम कागदपत्राचा समावेश असेल आणि त्यावर "ईव्हीएम कागदपत्रे" असे लिहावे;

एक) नोंदविण्यात आलेल्या मतांची आकडेवारी असलेले मोहोरबंद न केलेले पाकिट नमुना -१७सी.

(दोन) मतदान केंद्राध्यक्षाचा अहवाल एक (अभिरुप मतदान प्रमाणपत्र), दोन व तीन असलेले मोहोरबंद न केलेले पाकिट.

**(तीन) अभिरूप मतदानाच्या व्हीव्हीपॅटच्या मुद्रित कागदी चिठ्ठ्या काळ्या रंगाच्या मोहोरबंद लिफाफ्यात ठेवाव्यात.**

वरील सर्व निवडणूक कागदपत्रे मोहोरबंद न केलेल्या पांढऱ्या मोठ्या लिफाफ्यात ठेवावेत. (लिफाफा क्रमांक : १/१) आणि मतदान झालेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासाठीच्या सुरक्षित कक्षात ठेवावा.

एकाच वेळी दोन्ही निवडणुक असल्यास, वरील सर्व इलक्ट्रॉनिक मतदान यंत्र कागदपत्रे त्यांच्या-त्यांच्या संबंधित गुलाबी /काळ्या रंगाच्या लिफाफ्यांमध्ये स्वतंत्रपणे ठेवण्यात येतील, आणि ते विधानसभा मतदानासाठी मतदान झालेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासोबत, मतदान झालेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांसाठीच्या सुरक्षित कक्षात ठेवण्यात यावीत.

**दोन.** दुसऱ्या लिफाफ्यामध्ये खाली नमूद केलेले मोहोरबंद न केलेले/मोहोरबंद केलेले लिफाफे ठेवावेत आणि त्यावर “ छाननी पाकीट ” म्हणून मोठ्या अक्षरात लिहावे.

(एक) मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी असलेला मोहोरबंद न केलेला लिफाफा.

(दोन) मतदार नोंदवही (१७ए) असलेला मोहोरबंद केलेला लिफाफा.

(तीन) नमुना १४ए मधील अंध व अपंग मतदारांची यादी आणि सोबत्यांची घोषणापत्रे असलेला मोहोरबंद न केलेला लिफाफा

(चार) अभ्यांगत भेट प्रपत्र असलेला मोहोरबंद न केलेला लिफाफा वरील सर्व निवडणूक कागदपत्रे मोहोरबंद न केलेल्या पांढऱ्या रंगाच्या मोठ्या लिफाफ्यात (लिफाफा क्र. : २/१) ठेवण्यात यावीत आणि छाननीसाठी आवश्यक असलेले मतदान केंद्रनिहाय छाननी पाकीट, मतदान झालेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपॅट असलेल्या, मतदान झालेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या सुरक्षित कक्षाव्यतिरिक्त दुसऱ्या सुरक्षित कक्षात स्वतंत्रपणे संग्रहित करण्यात यावीत.

**तीन.** तिसऱ्या पाकिटामध्ये खाली नमूद केलेले मोहोरबंद लिफाफे ठेवावेत आणि त्यावर न “ सांविधिक पाकीट ” म्हणून मोठ्या अक्षरात लिहावे.

(एक) चिन्हांकित मतदार यादी असलेला मोहोरबंद केलेला लिफाफा.

(दोन) मतदार चिठ्ठ्या असलेला मोहोरबंद केलेला लिफाफा.

(तीन) न वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका असलेला मोहोरबंद केलेला लिफाफा.

(चार) वापरण्यात आलेल्या प्रदत्त मतपत्रिका आणि नमुना १७बी मधील यादी असलेला मोहोरबंद केलेला लिफाफा.

(पाच) नमुना १४ मधील आक्षेपित मतांची यादी असलेला मोहोरबंद केलेला लिफाफा.

मोहोरबंद केलेल्या लिफाफ्यातील वरील सर्व सांविधिक कागदपत्रे, मोहोरबंद केलेल्या पांढऱ्या रंगाच्या मोठ्या लिफाफ्यामध्ये (लिफाफा क्र. ३/१) ठेवण्यात यावीत. एकाच वेळी निवडणुका असल्यास, विधानसभा मतदानासाठीचा गुलाबी रंगाच्या मतदार चिठ्ठ्या असलेला गुलाबी रंगाचा लिफाफा या लिफाफ्यात ठेवण्यात यावा.

**चार.** चौथ्या पाकिटामध्ये पुढील लिफाफे असतील आणि त्यावर “ असांविधिक पाकीट ” असे मोठ्या अक्षरात लिहावे.

(एक) मतदार यादीची प्रत किंवा प्रती (चिन्हांकित मतदार यादी व्यतिरिक्त) असलेला मोहोरंबद न केलेला लिफाफा.

(दोन) नमुना १० मध्ये मधील मतदान प्रतिनिधींचे नेमणूकपत्र आणि मतदान प्रतिनिधींच्या नेमणुकीचा हिशोब असलेला मोहोरबंद न केलेला लिफाफा.

(तीन) नमुना १२बी मधील निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र असलेला मोहोरबंद न केलेला लिफाफा.

(चार) मतदान केंद्राध्यक्षाची प्रतिज्ञापत्रे असलेला मोहोरबंद न केलेला लिफाफा.

(पाच) आक्षेपित मतांच्या बाबतीत, कोणतेही असल्यास, पावती पुस्तक आणि रोख यांचा समावेश असलेला मोहोरबंद न केलेला लिफाफा.

(सहा) वापरण्यात न आलेल्या आणि खराब झालेल्या मोहोरा आणि विशेष खूणचिठ्ठ्या असलेला मोहोरबंद न केलेला लिफाफा.

(सात) वापरण्यात न आलेल्या मतदार चिठ्ठ्यांचा मोहोरबंद न केलेला लिफाफा

(आठ) मतदाराकडून घेतलेले त्याच्या वयाचे प्रतिज्ञापत्रे आणि ज्या मतदारांनी त्यांच्या वयाचे प्रतिज्ञापत्रे देण्याचे नाकारलेले आहे अशा मतदारांची यादी यांकरिता असेलेला मोहोरबंद न केलेला लिफाफा.

(नऊ) नियम ४९ एमए अन्वये मतदाराने करावयाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना (चाचणी मत)

(दहा) अनुपस्थित, स्थलांतरित व मयत यादीत नाव असलेल्या मतदारांच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना.

(अकरा) पोलीस ठाणे अंमलदारास करावयाच्या तक्रारीचे पत्र.

एकाच वेळी दोन्ही निवडणुका असल्यास, विधानसभा निवडणुकीसाठी मतदान केंद्राध्यक्षाने करावयाची प्रतिक्षापत्रे असलेला गुलाबी रंगाचा मोहोरबंद न केलेला लिफाफा असंविधिक पाकिटामध्ये ठेवण्यासाठी आहे. लिफाफ्यांतील वरील सर्व अकरा अंसांविधिक कागदपत्रे पिवळ्या रंगाच्या मोठ्या मोहोरबंद केलेल्या लिफाफ्यात (लिफाफा क्र. ४/१) ठेवण्यात यावीत.

**पाच. पाचव्या पाकिटामध्ये पुढील बाबी असतील.**

(एक) मतदान केंद्राध्यक्षाची निदेश पुस्तिका

(दोन) इलेक्ट्रानिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट यांचे अनुदेश (क. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट वर मतदान कसे करावे याबाबतचे भित्तीपत्रक ख. मतदान केंद्राध्यक्षाकरिता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट यांच्या वापराबाबतची माहिती पुस्तिका आणि ग. इलेक्ट्रानिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट यांच्या वापरासंबधीच्या समस्यां शोधून काढणे व त्याचे निवारण करणे)

(तीन) मोहोरबंद केलेल्या लिफाफ्यांमध्ये (क. शाईची गळती किंवा बाष्पीभवन रोखण्यासाठी प्रत्येक बाटलीवर वितळलेल्या मेणासह किंवा मेण वापरून सुरक्षित करण्यात आलेल्या बुच असलेला पक्क्या शाईच्या बाटल्यांचा संच.

**ख. शाई असलेले पॅड्स.**

ग. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट यांच्या वापरावरील समस्या निवारण);

वरील सर्व पाच बाबी मोहोरबंद केलेल्या तपकिरी रंगाच्या मोठ्या लिफाफ्यात (लिफाफा क्र. ५/१) ठेवण्यात याव्यात.

**सहा. सहाव्या पाकिटात, पुढील सामग्रीचा समावेश असेलः—**

(एक) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची वापरलेली यादी ७ए.

(दोन) उमेदवारांच्या स्वाक्षरींची नक्कल प्रत, आणि

(तीन) इतर न वापरलेले नमुने या लिफाफ्याचा रंग निळा असावा. (लिफाफा क्र. ६/१) मतदान केंद्राध्यक्षाची धातुची मोहोर;

(चार) प्रदत्त मतपत्रिकावर खूण करण्याचा बाण फुली चिन्हाचा रबरी शिक्का

(पाच) पक्की शाई ठेवण्यासाठीचा कप. उर्वरित सर्व लेखन सामग्रीच्या वस्तू पुन्हा पारदर्शक पुठ्ठ्याच्या/प्लास्टिकच्या खोक्यांत ठेवण्यात याव्यात आणि स्वीकृती केंद्रावर जमा कराव्यात.

**२.४ मतदानोत्तर जबाबदारी**

२.४.१ राखीव ठेवलेले आणि अभिरुप मतदाना दरम्यान कार्यान्वित न झालेले इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि नियंत्रण युनिट व व्हीव्हीपॅट यांच्या बाहेर काढलेल्या ऊर्जा संचासह (पॉवर पॅक) व्हीव्हीपॅट जमा करणे.

मतदानाच्या दिवशी, मतदान समाप्त झाल्यानंतर तात्काळ, क्षेत्र अधिकाऱ्याने स्वतः **प्रवर्ग-सी** (अभिरुप मतदानादरम्यान कार्यान्वित न झालेले इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपॅट आणि **प्रवर्ग-डी** (न वापरलेली राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपॅट) स्वीकृती केंद्रात किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने खास त्यासाठी राखून ठेवलेल्या इतर ठिकाणी जमा करावयाचे आहेत.

पी + १ दिवसाच्या कामाच्या बाबतीत, क्षेत्र अधिकाऱ्याने, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे खास राखून ठेवलेल्या मधल्या सुरक्षित कक्षात **सी व डी प्रवर्गाची इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपॅट** ठेवायची आहेत, आणि स्वीकृती केंद्रामध्ये किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने खास त्यासाठी राखून ठेवलेल्या इतर स्वीकृती केंद्रात किंवा ठिकाणी जमा करायचे आहेत आणि मतदान समाप्त झाल्यानंतर त्याच दिवशी, राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपॅट जमा करते वेळी राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा/व्हीव्हीपॅटचा तपशीलवार हिशोब विहित केलेल्या नमुन्यात **(जोडपत्र-पाच)** सादर करावयाचा आहे.

क्षेत्र अधिकाऱ्याने, मतदान समाप्त झाल्यानंतर मतदान दिवसाच्या कार्यकृतीं विषयीचा तपशील देऊन मतदान केंद्र निहाय अहवाल, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास सादर करावयाचा आहे. **(जोडपत्र-सहा)**

# प्रकरण ०३

## असुरक्षिततेचे मापन आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रे

### ३.१ प्रस्तावना

निवडणुकींच्या संदर्भातील असुरक्षिततेची व्याख्या, मतदारांला धाकदपटशा दाखवून किंवा अनुचित प्रभावाचा वापर करून किंवा कोणत्याही प्रकाराचा बळाचा वापर करून त्याद्वारे मुक्त व निःपक्ष रीतीने मतदाराला त्यांच्या मतदानाच्या हक्काचा वापर करण्यापासून अन्यायपणे पद्धतीने प्रतिबंधित करण्याची किंवा त्यांच्यावर चुकीचा प्रभाव टाकला जात असण्याची कोणत्याही मतदाराची किंवा मतदारांच्या गटाची दुर्बलता अशी करण्यात आली आहे. मग ते भौगोलिक दृष्ट्या निश्चित करण्यायोग्य क्षेत्रात राहत असोत किंवा नसोत, अशी करण्यात आली आहे.

असुरक्षिततेचे मापन म्हणजे समाजातील दुर्बल घटक जसे की, अल्पसंख्यांक किंवा अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, ज्यांना त्यांच्या निवडणुकीच्या हक्काचा मुक्तपणे वापर करण्यासाठी, कोणतीही धमकी, अनुचित प्रभाव, धाकदपटशा दाखवून किंवा हस्तक्षेप यामुळे असुरक्षित केले जात आहेत अशी मतदारांची गावे/वस्त्या/भाग निश्चित करणे.

निवडणुकांच्या संदर्भात, ‘ असुरक्षिततेचे मापन ’ करणे म्हणेज जे असुरक्षित असण्याची शक्यता आहे अशा मतदारांची किंवा मतदारांच्या गटाची अशा असुरक्षिततेस कारणीभूत असलेल्या व्यक्ती किंवा इतर अन्य घटक याची आगाऊ सुस्पष्ट निश्चिती करण्याच्या आणि अशा निश्चितीवर आधारित पुरेशा आधीच करणे निश्चित करणे आणि त्या आधारे आगाऊ सुधारात्मक कारवाई हाती घेणे असा दृष्टिकोन ठेवून करावयाचे आहे.

### ३.२ वैधानिक चौकट

भारतीय दंड संहितेचे कलम १७१ख (१) जो कोणी—

(एक) कोणत्याही व्यक्तीला कोणताही निवडणुकविषयक हक्क वापरण्यासाठी तिला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला प्रवृत्त करण्याच्या अथवा असा कोणताही हक्क वापरण्याबद्दल कोणत्याही व्यक्तीला बक्षिसी देण्याच्या हेतूने परितोषण देतो ; अथवा

(दोन) असा कोणताही हक्क वापरण्याबद्दल अथवा असा कोणताही हक्क वापरण्यासाठी अन्य कोणत्याही व्यक्तीला प्रवृत्त करण्याबद्दल किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करण्याबद्दल बक्षिसी म्हणून कोणतेही परितोषण स्वतःकरीता किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरिता स्वीकारतो ; त्याने लाचलुचपतीचा अपराध केला असे होते :

परंतु सार्वजनिक धोरण जाहीर करणे किंवा सार्वजनिक कृतीचे वचन देणे हा या कलमाखालील अपराध होणार नाही.

भारतीय दंड संहितेचे कलम १७१ग–भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ ग अन्वये, निवडणुकांमध्ये गैरवाजवी प्रभाव पाडणे हा एक निवडणुकविषयक अपराध आहे कोणत्याही निवडणुकविषयक हक्काच्या मुक्त वापरास जो कोणी इच्छापूर्वक अडथळा करील किंवा अडथळा करण्याचा प्रयत्न करील. त्याने निवडणुकीत गैरवाजवी प्रभाव पाडण्याचा अपराध केला असे होते.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याचे कलम १२३(२)–हे कलम अशी व्याख्या करते की, एखाद्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणुक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही निवडणुकविषयक अधिकाराच्या मुक्त वापरामध्ये, कोणताही प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे हस्तक्षेप करणे किंवा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करणे, ही भ्रष्टाचारी कृती समजण्यात येईल.

### ३.३ असुरक्षिततेचे मापदंड

३.३.१ प्रत्येक जिल्हा निवडणुक अधिकाऱ्याने, त्याच्या/तिच्या जिल्ह्यातील/मतदारसंघातील घटकांशी संबंधित सध्याच्या व मागील नोंदीवर आधारित माहिती गोळा करणे गरजेचे आहे. **व्ही एम-१ (जोडपत्र-एक)** मध्ये असुरक्षिततेवरील माहिती गोळा करण्यासाठीच्या मापदंडाचा एक संच दिला आहे जिल्हा निवडणुक अधिकारी प्रत्येक विधानसभा क्षेत्राच्या निवडणुक निर्णय अधिकाऱ्याकडून/उप विभागीय दंडाधिकाऱ्याकडून किमान सहा महिने आधी अशी माहिती गोळा करील आणि त्यानंतर ती सतत अद्ययावत करील.

३.३.२ क्षेत्र अधिकाऱ्याच्या नियुक्तीनंतर मागील (निवडणुकीच्या मतदानाच्या दिनांकाच्या पूर्वी चार महिने) असुरक्षित क्षेत्र निश्चित करण्याचे कार्य करण्यासाठी, ही माहिती त्याला/तिला दिली जाणे गरजेचे आहे. मतदार सर्वाधिक हितसंबंधित व्यक्ती असल्यामुळे, मतदारांकडून देखील माहिती गोळा करण्याकरिता काही मार्ग असतील. मदत, दूरध्वनी सेवा संपर्क-नि-सेवा केंद्र कॉल केंद्र (सेंटर्स)/ नियंत्रण कक्ष/सी-व्हिजिल (c-vigil) कार्यान्वित करण्यात येतील. आणि त्यांस पुरेशी प्रसिध्दी देण्यात येईल. असुरक्षित क्षेत्र निश्चित करण्याचे कार्य करण्यासाठी क्षेत्र अधिकाऱ्यास सक्षम बनविण्यासाठी, यथोचित प्रशिक्षण देखील आयोजित करणे गरजेचे आहे.

असुरक्षिततेच्या मापना संबंधातील अतिरिक्त मापदंडांचा तपशील नवीन नियमपुस्तिकेत आढळू शकतात.

३.३.३ क्षेत्र अधिकारी मतदान व्हीएम-२, **जोडपत्र-दोन** आणि व्हीएम-३, **जोडपत्र-तीन** मधील प्रपत्राच्या मदतीने केंद्राच्या, भेटी दरम्यान असुरक्षित क्षेत्रे तपासले आणि निर्धारित करेल, या कामानंतर जिल्हा निवडणूक अधिकारी संवेदनशीलता मापन नियमपुस्तिकेमध्ये दिलेल्या अतिरिक्त यंत्रणेद्वारे संवेदनशीलतेच्या अहवालाची पुन्हा पडताळणी करेल.

**३.४ असुरक्षिततेचे मापन (व्हीएम)/सरावाचे तीन टप्पे**

- मतदान होणाऱ्या सर्व मतदारासंघांमध्ये असुरक्षिततेचे मापन (व्हीएम) सराव कोणताही अपवाद न करता करण्यात येईल. असुरक्षिततेचे मापन आराखडा (व्हीएम) तीन टप्प्यात असेल.

- मतदारांना रोख/वस्तू रूपात लाच देण्यासह धमकी देणे किंवा धाकदपटशा यासारख्या गोष्टींमुळे असुरक्षित असलेले मतदार/ मतदार विभाग (गाव/वस्ती/क्षेत्रनिहाय) निश्चित करणे (शोधून काढणे).

- ताकदीच्या/पैशाच्या जोराचा वापर करून अशी असुरक्षितता निर्माण करणाऱ्या व्यक्ती निश्चित करणे.

- असुरक्षितता निर्माण करण्यासाठी कारणीभूत होणाऱ्या व्यक्तीविरुद्ध प्रतिबंधात्मक उपाय सुरू करणे.

**३.५ असुरक्षित क्षेत्रे/विभाग/गावे/वस्त्या निश्चित करणे.**

३.५.१ असुरक्षिता मापनाचा पहिला टप्पा म्हणजे क्षेत्र अधिकाऱ्याद्वारे त्याच्या नियुक्तीनंतर क्षेत्र पोलिस अधिकाऱ्यासह तात्काळ, आत्मविश्वास निर्माण करण्याच्या उपायांसाठी आणि असुरक्षित मापनाच्या सुलभीकरणासाठी क्षेत्रांना वारंवार भेट (किमान तीन) देणे. विधानसभा मतदारसंघाचा एक ठराविक क्षेत्र पोलीस ठाण्याअंतर्गत येते. असुरक्षित मापन करण्याच्या प्रयोजनार्थः जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक एक पोलीस कर्मचाऱ्याची व्यवस्था करतील, जो क्षेत्र अधिकाऱ्याच्या सोबत क्षेत्र पोलीस अधिकारी म्हणून काम करेल आणि निर्देशित भागात संवेदनाशीलता मापन संयुक्तपणे आयोजित करील. क्षेत्र पोलीस अधिकारी हा सहायक उप निरीक्षक किंवा हवालदाराच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसावा. असुरक्षित घरे/कुटुंबाची मतदान केंद्रनिहाय यादी क्षेत्र अधिकाऱ्याद्वारे परिशिष्ट-तीन मध्ये सादर करावी लागेल.

निवडणूक निर्णय अधिकारी आणि पोलीस अधीक्षक/उप विभागीय पोलीस अधिकारी संयुक्तपणे त्यांच्याकरिता दौऱ्याचा कार्यक्रम ठरवतील.

३.५.२ क्षेत्र अधिकाऱ्याने त्याच्या/तिच्या क्षेत्रातील प्रत्येक मतदान केंद्राच्या भागातील प्रत्येक वसतीस्थान/क्षेत्र खंडाला भेट दिली पाहिजे, स्थानिक लोकांशी विस्तृत चर्चा केली पाहिजे गुप्त माहिती गोळा केली पाहिजे. आणि संवेदनशील परिवार आणि कुटुंबे तसेच तेथे अशा असुरक्षिततेस कारणीभूत असणाऱ्या व्यक्ती आणि घटकांची यादी तयार केली पाहिजे.

हे करत असताना, त्याने/तिने असुरक्षिततेचे भूतकाळातील घटना आणि वर्तमान परिस्थितीतील भीती यांचा विचार करावा.

३.५.३ आयोगाने निवडणुक जाहीर केल्यानंतर लगेच क्षेत्र अधिकारी आपल्या क्षेत्रांना भेट देईल आणि प्रपत्र असुरक्षितता मापन -२ (क्षेत्र अधिकारी) व असुरक्षितता मापन -३ (क्षेत्र अधिकारी) मध्ये माहिती तयार करील. स्थानिक पोलीस अधिकारी आणि स्थानिक नागरी अधिकारी जसे की, तालुका विकास अधिकारी/ मामलेदार / पोलिस निरीक्षक इत्यादींचा देखील सल्ला घेतला जाईल आणि यादी/ नमुन्यांना अंतिम स्वरुप देण्यापूर्वी त्यांच्या अभिप्रायाचा विचार केला जाईल.

३.५.४ असुरक्षितता मापन-२ (क्षेत्र अधिकारी) हा नमुना फक्त एक साहाय्यभूत म्हणून आहे आणि गोळा केलेली माहिती कदाचित त्या पूर्तीच मयादीत नाही. जर तिचा मतदान केंद्राच्या संवेदनशीलतेवर परिणाम होत असेल तर अतिरिक्त माहिती त्यात जोडली जाऊ शकते.

३.५.५. क्षेत्र अधिकारी स्थानिक दौरा करत असताना असे नमुने अशा प्रत्येक वसतीस्थान / क्षेत्र खंडाकरीता भरले जाणे आवश्यक आहे. क्षेत्र अधिका-याने भरलेल्या नमुन्याच्या प्रती स्वतःकडे ठेवाव्यात आणि निवडणूक जाहीर झाल्याच्या ३ दिवसांच्या आत मतदान केंद्राध्यक्षाकडे भरलेले सर्व नमुने जमा केले पाहिजेत.

**३.६ अशा असुरक्षिततेस कारणीभूत असलेल्या व्यक्ती निश्चित करणे (शोधून काढणे)**

३.६.१ मतदार / गावांना असुरक्षित बनवण्यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींना निश्चित करण्याचे हे काम मतदान केंद्रनिहाय केले जाईल. गावाचे, वस्तीचे नावे ज्यात संभाव्य समस्या निर्माण करण्याच्या पत्यासह नावे आणि अशी इतर माहिती, माहिती देणाऱ्याची स्त्रोताची तशी इच्छा असल्यास हे कार्य पूर्ण गोपनियता राखून केले जाईल.

**३.७ निश्चित करण्यात आलेल्या असुरक्षित क्षेत्रांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याच्या उपाय योजना करण्याचे काम क्षेत्र अधिकाऱ्याद्वारे केले जाईल.**

- क्षेत्र अधिकारी नियमितपणे या भागांना भेट देईल आणि स्थानिक लोकांच्या संपर्कात राहील.
- अशा क्षेत्रांमध्ये पध्दतशीर मतदार शिक्षण व निवडणूक विषयक सहभागी केंद्री कार्यक्रम आणि जाणीव जागृती शिबिरे आयोजित केली जातील.
- सी-व्हीजील सारखी माहिती तंत्रज्ञानाची (आयटी) साधने आणि मतदार सहायता क्रमांक १९५० या भागात लोकप्रिय आणि प्रसिध्द केली जोतील.
- भरारी पथक (एफएसटीएस) स्थिर संनिरीक्षण पथक (एसएसटी), चित्रीकरण पाहणारे (वीवीटीएस) याव्दारे २४ तास लक्ष ठेवणे.

**३.८ मतदानाच्या दिवशी असुरक्षित क्षेत्र / व्यक्तींचे संनित्रण**

असुरक्षित व्यक्ती, जर कोणी असल्यास त्यांना भीती, धमकी किंवा धाकदपटशा शिवाय मतदान करता येईल याची सुनिश्चिती करण्यासाठी पुढील कृती करणे आवश्यक आहे.

३.८.१ क्षेत्र अधिका-यांला मतदान केंद्र परिसरातील असुरक्षितशील ठिकाणांची चांगली माहिती असावी.

३.८.२ कोणत्याही विवक्षित प्रभागामध्ये/ विभागामध्ये मतदान टक्केवारी अपेक्षेपेक्षा कमी असते, अशा प्रभाग / विभाग सारख्या संवेदनशील ठिकाणांचा अहवाल क्षेत्र अधिकारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास सादर करतील. ज्याचा छाननीच्या वेळेस निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास उपयोग होईल.

३.८.३ मतदानाच्या दिवशी क्षेत्र दंडाधिकारी आणि फिरते पथक किमान दोनदा त्यांना असुरक्षित क्षेत्र म्हणून निश्चीत केले गेले आणि जिथे मतदारांना संभाव्य धाकदपट केला जाण्याचा तक्रारी आहेत अशा गावांना / वस्त्यांना/ भागांना भेट देतील. या क्षेत्रांच्या त्यांच्या भेटीदरम्यान क्षेत्र दंडाधिकारी आणि फिरती पथके जेथे आवश्यक आहे तेथे अशा असुरक्षित मतदारांना पुरेशी सुरक्षा पुरविली जाईल याची सुनिश्चिती करतील.

३.८.४ भरारी पथके व फिरती पथके असुरक्षित ठिकाणांवर लक्ष ठेवतील आणि नियंत्रण कक्षाला माहिती देतील. जेथे आवश्यकता असेल तेथे, सर्व मतदारांना निर्भयपणे मतदान करता यावे यासाठी मुक्त व सुलभपणे माहिती मिळण्याची खात्री देण्यासाठी पोलिस चौक्या उभारण्यात येतील.

३.८.५ चार महिने अगोदर असुरक्षितता मापनाच्या कामाला सुरवात होईल. हे लक्षात घ्यावे की, असुरक्षितता मापन हे मतदान पूर्व काम आहे, म्हणून निर्धारित वेळापत्रकानुसार कामे पूर्ण झाली पाहिजेत.

| अ.क्र. (१) | कार्यक्रम (२) | वेळ मर्यादा (३) |
|---|---|---|
| १. | प्रत्येक विधानसभा विभागाचा निवडणूक निर्णय अधिकारी/उप जिल्हा दंडाधिकाऱ्या-कडून परिशिष्ट-एक नुसार जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे प्रत्येक विधानसभा मतदारसंघावरील मूलभूत माहिती गोळा करणे व तिचे संकलन. | मागील निवडणुकीच्या मतदानाच्या दिनांकापूर्वी सहा महिने |
| २. | जोडपत्र-एक नुसार जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे मूलभूत माहितीचे अद्ययावतीकरण | क्षेत्र अधिकाऱ्याला सोपविण्यापूर्वी |
| ३. | क्षेत्र अधिकारी व पोलीस क्षेत्र अधिकाऱ्याची नियुक्ती | मागील निवडणुकीच्या मतदानाच्या दिनांकापूर्वी चार महिने. |
| ४. | पोलीस ठाण्याच्या स्तरावर क्षेत्र पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती | मागील निवडणुकीच्या मतदानाच्या दिनांकापूर्वी चार महिने. |
| ५. | क्षेत्र अधिकाऱ्यांचे व क्षेत्र पोलीस अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे क्षेत्र अधिकाऱ्याला विधानसभा मतदारसंघाची मूलभूत माहिती सुपूर्द करणे. | मागील निवडणुकीच्या मतदानाच्या दिनांकापूर्वी चार महिने. |
| ६. | भारतीय निवडणूक आयोगाद्वारे चालविले जाणारे राज्याचे कार्यात्मक कायदा व सुव्यवस्था पोर्टल तयार करणे. | मागील निवडणुकीच्या मतदानाच्या शेवटच्या दिनांकापूर्वी चार महिने. |
| ७(क) | विहित नमुन्यात संवेदनशील क्षेत्रे/विभाग/गावे/पाडे, अशी संवेदनाशीलता निर्माण करणाऱ्या व्यक्ती इत्यादींची प्राथमिक ओळख पटविणे आणि संवेदनशीलता मापन अहवाल सादर करणे. | मागील निवडणुकीच्या मतदानाच्या शेवटच्या दिनांकापूर्वी दोन महिने. |
| ७(ख) | विहित नमुन्यात संवेदनशील क्षेत्रे/विभाग/गावे/पाडे, अशी संवेदनशीलता निर्माण करणाऱ्या व्यक्तीची अंतिम ओळख पटविणे. | आयोगाकडून प्रसिद्धीपत्रक काढल्यानंतर आणि **राजपत्रात** अधिसूचना काढण्यापूर्वी. |
| ८. | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला विहित नमुन्यात सर्व संवेदनाशीलता मापन अहवालाचे सादरीकरण. | निवडणूक जाहीर झाल्याच्या ३ दिवसांच्या आत |
| ९.(क) | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे तयार करण्यात आलेल्या क्षेत्र अधिकाऱ्यांच्या अहवालांचे संकलन आणि विहित नमुन्यामध्ये जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांला सादर करणे. | निवडणूक जाहीर झाल्याच्या ५ दिवसांच्या आत |
| ९(ख) | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या असुरक्षितता मापन अहवालाचे संकलन करणे आणि विहित नमुन्यामध्ये मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला सादर करणे. | निवडणूक जाहीर झाल्याच्या ७ दिवसांच्या आत |
| १० | मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे देण्यात येणारे विधानसभा मतदारसंघात असुरक्षित गाव/क्षेत्र नसल्याचे प्रमाणपत्र | निवडणूक जाहीर झाल्याच्या ७ दिवसांच्या आत |
| ११ | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या असुरक्षितता मापन अहवालाचे संकलन आणि असुरक्षितता मापन अहवाल ६ मध्ये (मुख्य निवडणूक अधिकारी) भारतीय निवडणूक आयोगाला सादर करणे. | निवडणूक जाहीर झाल्याच्या १० दिवसांच्या आत |
| १२. | संवेदनशीलतेस कारणीभूत असणाऱ्या व्यक्तीविरुद्ध करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक कायदेशीर कारवाईचे संकलन. | मतदानाच्या दिवसापूर्वी कमीत कमी ७ दिवस. |

| | | |
|---|---|---|
| १३. | अतिसंवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या क्षेत्रांमध्ये जिल्हा दंडाधिकारी/पोलीस अधीक्षक; उप विभागीय दंडाधिकारी/पोलीस उप अधीक्षक; तहसीलदार/पोलीस निरीक्षकांद्वारे संयुक्त विश्वास निर्माण करणाऱ्या भेटींची योजना तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे. | मतदानाच्या दिवसापूर्वी आठवड्यांच्या आत |
| १४. | केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाद्वारे मतदान पूर्व क्षेत्रावर वर्चस्व (ताब्यात घेणे) | मतदानाच्या दिवसापूर्वी कमीत कमी ३-५ दिवस |
| १५. | निरीक्षक, जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी, क्षेत्र अधिकारी, पोलीसाद्वारे असुरक्षित क्षेत्रांवर/व्यक्तींवर कठोर पहारा ठेवणे व संनियत्रण करणे. | मतदानाच्या दिवशी |

**३.९ जबाबदारी व उत्तरदायित्व**

३.९.१. संवेदनाशीलता मापनासाठीच्या आणि प्रत्येक टप्प्यावरील त्याच्या पाठपुरावा करण्याच्या विविध क्षेत्र अधिकारी व क्षेत्र पोलीस कर्मचाऱ्याच्या जबाबदारीची व्याख्या प्रत्येक मतदान केंद्र/मतदार संघाच्या संदर्भासह स्पष्टपणे केली जाईल. या संदर्भात कोणत्याही पोलीस/नागरी कर्मचाऱ्यानी कर्तव्यात कसूर केल्यास कठोर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.

३.९.२. हा सल्ला देण्यात येत आहे की, कोणत्याही निवडणूकीदरम्यान असुरक्षितता मापन असुरक्षित क्षेत्रे, पाडे, समस्या निर्माण करणारे इत्यादींशी संबंधित कोणत्याही प्रकारचे तपशीलाशी संबंधित किंवा या प्रयोजनासाठी सुरक्षा दलांच्या तैनातीशी संबंधित कोणत्याही प्रकारच्या तपशीला संदर्भात कोणत्याही प्रकारची पत्रकार परिषद आयोजित करू नये किंवा सार्वजनिक स्थळावर माहिती उपलब्ध करून देऊ नयेत. क्षेत्रात काम करणाऱ्या यंत्रणेला योग्य त्या सूचना या संदर्भात दिल्या जाऊ शकतात. असुरक्षिततेविषयी प्रसारमाध्यमांना कोणतीही माहिती, आवश्यक असल्यास केवळ आयोगाद्वारे किंवा आयोगाच्या निदेशानुसार संबंधित राज्य/संघ राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याद्वारे दिली जाईल.

**३.१० अतिसंवेदनशील मतदान केंद्रे**

निवडणूक आयोजित करण्यासाठी, सर्व हितसंबंधितांकरिता शांततापूर्ण आणि पारदर्शक वातावरण निर्माण करण्यासाठी पुरेसे सशस्त्र पोलीस दल कर्मचारी तैनात करणे आंतरजालावरून प्रक्षेपण (वेबकास्टिंग) इत्यादीसारख्या, सुरक्षा उपायांच्या सुनिश्चितीसाठी परिशिष्ट-सहामध्ये दिलेल्या विवक्षित वस्तुनिष्ठ निकषांवर अतिसंवेदनशील मतदान केंद्राची ओळख पटवली जाते. क्षेत्र अधिकाऱ्याला या वस्तुस्थितीची जाणीव असावी की, संवेदनशीलता मापनाअंतर्गत ओळखलेली सर्व मतदान केंद्रे अतिसंवेदनशील मतदान केंद्रे म्हणून संबोधली गेली आहेत, त्याच्या उलट नाही.

सोबत जोडलेल्या निदर्शकाच्या आधारावर अतिसंवेदनशील मतदान केंद्रे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मतदान केंद्रांच्या संदर्भात पुढीलपैकी एक किंवा अधिक उपाययोजना केल्या जातील :—

* मतदान केंद्राच्या सुरक्षेसाठी केंद्रीय सशस्त्र पोलीस बलाची कमाल मर्यादित उपस्थिती.

* केंद्रीय सशस्त्र पोलीस दलरहित उपाय म्हणून व्हिडीओ कॅमेरा, लघु संदेश/उपयोजक आधारित संनियंत्रण व आंतरजालावरून प्रक्षेपण (वेब-कास्टिंग) (त्यापैकी किमान एक) मतदान केंद्रात ठेवण्यात येईल. आंतरजालावरून प्रक्षेपण (वेब-कास्टिंग) सर्व अतिवेदनशील मतदान केंद्रांवर केले जाईल आणि संवेदनशील क्षेत्रातील सर्व मतदान केंद्रे किंवा सहायक मतदान केंद्रांवर एकूण मतदान केंद्राच्या किमान ५० टक्के यापैकी जे अधिक असेल तेथे केले जाईल.

* मतदान केंद्राच्या आत मतदान केंद्राच्या ठिकाणी सूक्ष्म निरीक्षक तैनात केले जातील.

* मतदान केंद्राध्यक्षाला मतदार छायाचित्र ओळखपत्र/मान्यता दिलेले ओळख पटविणारे दस्तवेज जर असेल तर, योग्यरीत्या पडताळले गेले आहेत आणि नमुना १७ सी च्या रकान्यात शेऱ्यामध्ये प्रतिबिंबित झाले आहे. हे सुनिश्चित करण्यासाठी विनिर्दिष्ट संक्षिप्त माहिती देण्यात येईल.

## प्रकरण–४

## अनुपस्थित मतदारांद्वारे टपाल मतपत्रिकेमार्फत मतदान

**४.१. निवडणुका घेण्याबाबत (सुधारणा) नियम, २०१९ आणि निवडणुका घेण्याबाबत (सुधारणा) नियम, २०२० त्याच बरोबर निवडणूक आयोगाच्या दिनांक १६ जुलै, २०२० समक्रमांकाच्या निर्णयानुसार अनुपस्थित मतदारांच्या खालील श्रेणींना टपाल मतपत्रिकेद्वारे मतदान करण्यासाठी सुविधा देण्यात आलेली आहे.**

(एक) ज्येष्ठ नागरिक (८० वर्षे वरील वयाचे) [ एव्हीएससी–जेष्ठ नागरिक (प्रवर्गातील) अनुपस्थित मतदार. ]

(दोन) संदर्भित दिव्यांग व्यक्तीं [ एव्हीपीडी संदर्भित दिव्यांग (प्रवर्गातील) अनुपस्थित मतदार. ]

(तीन) कोविड-१९ संशयित किंवा बाधित व्यक्ती [ एव्हीसीओ कोविड-१९ (प्रवर्गातील) अनुपस्थित मतदार. ]

(चार) अत्यावश्यक सेवेतील मतदार [ एव्हीइएस–अत्यावश्यक सेवा (प्रवर्गातील) अनुपस्थित मतदार. ]

**४.२. अनुपस्थित उमेदवारांकडून टपाली मतपत्रिका वापरण्याची प्रक्रिया.**

४.२.१ टपाली मतपत्रितेद्वारे मतदान करू इच्छिणाऱ्या अनुपस्थित मतदारला संबंधित मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे नमुना-१२ डी मध्ये सर्व आवश्यक तपशील देऊन अर्ज करावा लागेल. टपाली मतपत्रिकेची सुविधा मागणारे असे अर्ज निवडणुका जाहीर झाल्याच्या तारखेपासून **संबंधित निवडणुकीच्या अधिसूचनेच्या तारखेपासून पाच दिवसांपर्यंत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पोहचायला हवेत.**

४.२.२ निवडणुकीच्या वेळी कोणताही मतदार कोविड-१९ च्या कारणास्तव राज्यातील दवाखान्यात दाखल आहे किंवा कोविड-१९ मुळे गृह/संस्थात्मक विलगीकरणात असल्यास आणि त्यामुळे वैद्यकीय सल्ल्यानुसार स्वतः मतदान केंद्रावर जाऊन मतदान करण्याच्या स्थितीत नसल्यास, आणि त्या मतदाराने टपाली मतपत्रिका देण्याची विनंती केल्यास, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी अर्जाच्या वास्तविकतेबद्दल समाधानी असल्यास, मतदाराला टपाली मतपत्रिका उपलब्ध करून देईल.

४.२.३ मतदारसंघातील मतदानासाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी उक्त मतदारास टपाली मतपत्रिका वितरित करण्याची आणि त्याच्याकडून ती जमा करून घेण्याची व्यवस्था निवडणूक निर्णय अधिकारी करेल. आयोगाच्या निर्देशानुसार मुख्य सचिवांनी नियुक्त केलेल्या कोविड-१९ साठीच्या मध्यस्त (नोडल)अधिकाऱ्याच्या समन्वयाने याबाबत व्यवस्था केली जाईल. अशा मतदारांकडून येणाऱ्या टपाली मतपत्रितेसाठीच्या अर्जासोबत (नमुना-१२डी) कोविड-१९ झाल्यामुळे अर्जदार राज्यातील रुग्णालयात दाखल आहे किंवा त्याचे राज्यातच (गृह किंवा संस्थात्मक) विलगीकरण करण्यात आले आहे, असे दर्शविणारी सक्षम प्राधिकरणांनी दिलेल्या प्रमाणपत्राची/सूचनांची प्रत जोडलेली असावी.

४.२.४ ज्याने टपाली मतपत्रिकेची निवड केली आहे अशा, संदर्भित दिव्यांग व्यक्ती (पीडब्ल्यूडी) श्रेणीतील (AVPD) अनुपस्थित मतदारांच्या बाबतीत त्यांच्या अर्जासेबत (नमुना-१२डी) दिव्यांग व्यक्तींचे हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम २ अंतर्गतच्या संबंधित प्रमाणान प्राधिकरणाने प्रमाणित केलेली संदर्भित दिव्यांगता (विनिर्दिष्ट केलेल्या दिव्यांगतेच्या ४० टक्के पेक्षा कमी नसावी) प्रमाणपत्राची प्रत असावी.

**४.३ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे काम/ची कृती-मतदान केद्रस्तरीय अधिकाऱ्याद्वारे नमुना-१२ डी चे वितरण :**

४.३.१ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून पुरविण्यात आलेल्या तपशिलानुसार मतदान केंद्रस्तरीय अधिकारी मतदान केंद्र परिसरात जेष्ठ नागरिक (प्रवर्गातील) अनुपस्थित मतदार (AVSC), दिव्यांग (प्रवर्गातील) अनुपस्थित मतदार (AVPD) आणि कोविड-१९ (प्रवर्गातील) अनुपस्थित मतदार (AVCO) या श्रेणीतील अनुपस्थित मतदारांच्या घरी भेट देतील आणि संबंधित मतदारांना नमुना १२-डी वितरीत करतील आणि त्यांच्याकडून पोचपावती घेतील.

४.३.२. मतदार केंद्रस्तरीय अधिकारी मतदारांकडून मिळालेल्या सर्व पोच पावती निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे जमा करतील.

४.३.३. मतदार उपलब्ध नसल्यास, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी त्याचा/तिचा संपर्क तपशील देईल आणि अधिसूचनेच्या दिनांकापासून पाच दिवसांच्या आत ते जमा करण्यासाठी पुन्हा भेट देईल.

४.३.४. मतदार, टपाली मतपत्रिकेची निवड करेल किंवा करणार नाही जर त्याने टपाली मतपत्रिकेची निवड केली, तर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी मतदाराच्या धरून भरलेला नमुना १२ डी जमा करेल आणि अधिसूचनेच्या दिनांकापासून पाच दिवसांच्या आत तात्काळ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे जमा करेल.

४.३.५. क्षेत्र अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या संपूर्ण देखरेखीखाली मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांद्वारे करण्यात येणाऱ्या नमुना १२ डी च्या वितरण आणि संकलनाच्या प्रक्रियेचे पर्यवेक्षण करतील.

.................

## जोडपत्र—एक

### असुरक्षिततेच्या मापनाची रूपरेषा—१

**क्षेत्र अधिकाऱ्याने असुरक्षिततेच्या मापनाचे काम सुरु करण्यापूर्वी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने प्रत्येक मतदारसंघ/क्षेत्राची माहिती पुरविलेली माहिती विचारात घेतली पाहिजे.**

१. विधानसभा मतदारसंघात/क्षेत्रांमध्ये झालेल्या मागील लोकसभा निवडणूकांमध्ये नोंदवले गेलेल्या निवडणुकासंदर्भातील गुन्ह्यांची संख्या (आवश्यक असेल तेथे तपशील द्या.)

२. विधानसभा मतदारसंघात क्षेत्रांमध्ये झालेल्या मागील विधानसभा निवडणुकामध्ये नोंदवले गेलेल्या निवडणुकासंदर्भात गुन्ह्यांची संख्या (आवश्यक असेल तेथे तपशील द्या.)

३. विधानसभा मतदारसंघ/क्षेत्रामध्ये झालेल्या मागील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकामध्ये नोंदवले गेलेल्या निवडणुकासंदर्भातील गुन्ह्यांची संख्या (आवश्यक असेल तेथे तपशील द्या.)

४. गेल्या वर्षभरात या परिसरात नोंदविलेल्या गेलेल्या गंभीर फौजदारी गुन्हे, जातीय संघर्ष आणि सांप्रदायिक घटना यांची संख्या कोणतीही असल्यास (आवश्यक असेल तेथे तपशील द्या.)

५. मागील लोकसभा निवडणुकांमध्ये जर आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाले यांचे प्रसंग कोणतेही असल्यास, (आवश्यक असेल तेथे तपशील द्या.)

६. मागील विधानसभा निवडणुकांमध्ये जर कोणतेही आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाले असल्यास (आवश्यक असेल तेथे तपशील द्या.)

७. मागील लोकसभा निवडणुकांमध्ये भरारी पथके/स्थिर संनिरिक्षण पथके यांच्याद्वारे केलेल्या/पकडल्याच्या रोख/वस्तूरूपी गोष्टी/अडवणूकीच्या घटनांची संख्या (आवश्यक असेल तेथे तपशील द्या.) आणि गेल्या लोकसभा निवडणुकीमधील खर्च विषयक संवेदनशील क्षेत्र खंडांचा तपशील.

८. मागील विधानसभा निवडणुकांमध्ये भरारी पथके/स्थिर संनिरिक्षण पथके यांच्याद्वारे केलेल्या/पकडल्याच्या रोख/वस्तूरूपी गोष्टी/अडवणुकीच्या घटनांची संख्या (आवश्यक असेल तेथे तपशील द्या.) आणि गेल्या विधानसभा निवडणुकांमधील खर्च विषयक संवेदनशील क्षेत्र खंडांचा तपशील.

९. लोकसभा किंवा विधानसभेच्या मागील सार्वत्रिक निवडणुकांमध्ये किंवा कोणत्याही पोट निवडणुकांमध्ये जर कोणतीही फेर निवडणूक झाली असल्यास त्याचा तपशील.

१०. मागील लोकसभा/विधानसभा आणि स्थानिक निवडणुकांमध्ये प्रतिबंधात्मक कायद्याशी संबंधित प्रकरणांचे तपशील.

११. विधानसभा मतदार संघक्षेत्रातल्या सद्या तडीपार/स्थानबद्धतेमध्ये असलेल्या व्यक्तींची नावे.

१२. संबंधित राज्य उत्पादन शुल्क अधिनियमांतर्गत येणाऱ्या क्षेत्रांत नोंदवण्यास आलेल्या प्रकरणांची संख्या आणि महत्त्वाच्या प्रकरणांचा तपशील.

१. मागील लोकसभा निवडणुकांमध्ये

२. मागील विधानसभा निवडणुकांमध्ये

३. मागील एका वर्षांत.

१३. शस्त्रासंबंधी माहिती.

१४. अंमली औषधिद्रव्ये व मनः प्रभावी पदार्थ अधिनियमाचे उल्लंघन करणाऱ्या प्रकरणांचा तपशील.

१५. निवडणूक संबंधित प्रकरणांमधील क्षेत्राच्या प्राश्वासनांची (आश्वासनांची) सूची.

१६. त्या क्षेत्रातील सराईत गुन्हेगारांची (गुन्हांच्या तपशीलांसह) सूची.

१७. विधानसभा मतदारसंघ/क्षेत्राच्या मतदार यादीशी संबंधित, कोणत्याही असल्यास, निवडणूकपूर्व तक्रारी असल्यास, त्यांचा तपशील.

१८. इतर कोणत्याही मतदानपूर्व तक्रारी असल्यास त्यांचा तपशील.

१९. विधानसभा मतदारसंघ/क्षेत्रांत आणि तिथून बाहेर अशा पद्धतीने मागील ०६ महिन्यांतील सर्वसामान्यपणे होणाऱ्या स्थलांतरापेक्षा जास्त स्थलांतर झाले असल्यास त्या बद्दल माहिती, जर असेल तर.

२०. नेमून दिलेल्या मतदान केंद्रावर मतदानासाठी आलेल्या मतदारांच्या तपशीलासह मागील लोकसभा निवडणुकीत मतदानासाठी आलेल्या मतदार आणि त्यांची टक्केवारीचा (%) तपशील.

पुरूष :

स्त्री :

एकूण :

२१. नेमून दिलेल्या मतदान केंद्रावर मतदानासाठी आलेल्या मतदारांची एकूण (संख्या तपशिलासह) मागील विधानसभा निवडणुकीत मतदानासाठी आलेल्या मतदारांच्या संख्या आणि टक्केवारी :

पुरूष :

स्त्री :

एकूण :

## परिशिष्ट-दोन

## असुरक्षिततेचे मापन २ : क्षेत्र अधिकारी/क्षेत्र अधिकाऱ्यांद्वारे असुरक्षितता निश्चित करण्यासाठीचे प्रपत्र

असुरक्षिततेचे मापन

(मतदान केंद्रनिहाय)

निवडणूक आणि वर्ष :

विधानसभा मतदारसंघ/लोकसभा मतदारसंघ क्रमांक आणि नाव : क्षेत्र क्रमांक :

मतदान केंद्र/ठिकाण/क्रमांक व नाव :

माहितीची तारीख :

**भाग-अ**

| | |
|---|---|
| १. | गेल्या एका वर्षात गावात/परिसरात दोन किंवा अधिक जाती/समुदाय/गट यांच्यात संघर्ष झाला आहे का ? (असल्यास, त्याचा तपशील). |
| २. | गावात/परिसरात दोन किंवा अधिक जाती/समुदाय/गट यांच्यात मोठ्या प्रमाणावर राजकीय प्रतिस्पर्धा किंवा राजकीय दंगल झाल्याची कोणतीही घटना घडली आहे का ? (असल्यास, त्याचे तपशील आणि त्यात सहभाग गट). |
| ३. | गेल्या विधानसभा/लोकसभा/स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीदरम्यान निवडणुकीशी संबंधित कोणतेही गुन्हे/ घटना घडल्या आहेत का ? (असल्यास, त्याचा तपशील). |
| ४. | गेल्या एका वर्षात गावात झालेल्या/नोंदणी झालेल्या, खून, बलात्कार, अत्याचार, दंगल यासारख्या अत्यंत गंभीर गुन्ह्यांचा तपशील आणि त्यात सहभागी व्यक्ती/गट आणि तो ज्या भागात झाला त्याचा तपशिल. |
| ५. | गेल्या वर्षात तडीपार करण्यात आलेल्या किंवा स्थानबद्ध करण्यात आलेल्या व्यक्तींची नावे. |
| ६. | सध्या तडीपार किंवा स्थानबद्ध करण्यात आलेल्या व्यक्तींची नावे. |
| ७. | गाव/क्षेत्र आणि परिसरात प्रचलित असलेली राजकीय परिस्थिती लक्षात घेता संघर्षाच्या घटना घडण्याची शक्यता आहे काय ? (असल्यास, त्याची कारणे आणि त्यात सहभागी गट). |
| ८. | कोणत्याही जाती/समूह/कुटुंबाला मत देण्यापासून रोखले जाईल अशी भीती वाटते का ? (असल्यास, जात/गट/कुटूंबाचा तपशील आणि त्यांना कोणाकडून आणि कोणत्या प्रकारचा धोका आहे). |
| ९. | कोणत्याही जाती/समुदाय/गट/ घरातील महिलांना मतदन करण्यापासून रोखले जाईल अशी भीती वाटते का ? (असल्यास, अशा प्रकारच्या व्यक्ती/घरगुती/गटाचे तपशील आणि त्यांना कोणाकडून आणि कोणत्या कारणासाठी भीती वाटते?). |
| १०. | क्षेत्र/गावातील काही संपर्काची ती ठिकाणे कळली आहेत का ? जेणेकरून असा घडामोडीशी संबंधित माहितीचा सतत मागोवा घेता येऊल. त्याचा तपशील. |
| ११. | मागील दोन सार्वत्रिक निवडणूकांमध्ये उमेदवाराद्वारे रोख रक्कम, दारू, मोबाईल रिचार्ज, दुपारचे जेवण इत्यादींच्या प्रलोभनाची प्रकरणे गावात/क्षेत्रात निदर्शनास आली आहेत किंवा कसे ? (कृपया महिला, तरूण मतदार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मतदारांच्या संदर्भात तपासा) होय असल्यास, त्याचे तपशील. |
| १२. | इतर तपशील कोणताही असल्यास. |
| १३. | ज्यांच्या उपस्थितीत वरील पुनरावलोकन केले गेले अशा स्थानिक लोकांचा तपशील (त्यापैकी दोन वृद्ध, दोन महिला आणि दोन तरूण आणि इतर लोक) |

**टीप.**—दर स्त्रोत त्यांचे तपशील उघड करण्यास तयार असतील तरच हे तपशील नोंदविले जातील.

| अ.क्र. (१) | नाव (२) | गावातील कोणत्या भागात राहतात (३) | स्वाक्षरी (४) |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |
| ... | | | |

**भाग-ब**

**(एक) असुरक्षित घरे/कुटुंबांची यादी**

| अ.क्र. (१) | घर क्रमांक/कुटुंबाचे नाव/ कुटुंबाच्या इतर ओळखीचा तपशील (२) | स्तंभ-२ मध्ये असुरक्षित म्हणून निश्चित केलेल्या घर/कुटुंबातील मतदारांची संख्या (३) | कुटुंबाचा संपर्क क्रमांक, जर कोणताही असल्यास, (४) | केलेली/प्रस्तावित कार्यवाही (५) | शेरा (६) |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| एकूण | | | | | |

**(दोन) बळाचा/पैशांचा वापर करून असुरक्षिततेसाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींची यादी**

| अ.क्र. (१) | व्यक्तीचे नाव (२) | व्यक्तींचा संपर्क क्रमांक आणि घराचा पत्ता (३) | धाकदपटशासाठी संशायित/असुरक्षित शक्यता असलेले क्षेत्र/ गाव/ठिकाण (४) | केलेली/प्रस्तावित कार्यवाही (५) | शेरा (६) |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| एकूण | | | | | |

**भाग-क**

**प्रमाणपत्र**

या द्वारे, असे प्रमाणित करण्यात येत आहे की, विधानसभा/संसादिय निवडणूक २०— च्या दृष्टीकोनातून माझ्या क्षेत्रात समाविष्ट आहे असे मतदान केंद्र क्रमांक ——————————— मतदान केंद्राचे नाव ——————————————— च्या क्षेत्रातील **असुरक्षित** आहे असा कोणताही परिसर/क्षेत्र खंड/मतदार प्रभाग या नमुन्यामध्ये समाविष्ट करावयाचा राहून गेलेला नाही.

| | |
|---|---|
| क्षेत्रीय पोलीस अधिकाऱ्याची स्वाक्षरी<br><br>नाव :<br><br>पदनाम :<br><br>दूरध्वनी क्रमांक :<br><br>विधानसभा मतदारसंघ क्रमांक : | क्षेत्र अधिकारी/क्षेत्रीय दंडाधिकाऱ्याची स्वाक्षरी<br><br>नाव :<br><br>पदनाम :<br><br>क्षेत्र क्रमांक :<br><br>विधानसभा मतदारसंघ क्रमांक : |

## जोडपत्र–तीन

## संवेदनशील क्षेत्र निश्चित करणे-३ (क्षेत्र अधिकारी)

## क्षेत्र अधिकाऱ्याने मतदान केंद्रनिहाय संवेदनशील ठिकाणांची खंडांची क्षेत्र (पॉकेटस्‌ची) मतदार प्रभागांची आणि मध्ये असलेल्या सुरक्षित कक्षांची सारांश स्वरूपात माहिती देणे (क्षेत्रनिहाय)

निवडणूक व वर्ष :

विधानसभा मतदारसंघाचे/लोकसभा मतदारसंघाचे नाव :

क्षेत्राचे नाव :

| अ.क्र. (१) | विषय (२) | एकूण संख्या (३) |
|---|---|---|
| १. | क्षेत्र अधिकाऱ्याला नेमून दिलेल्या मतदान केंद्रांची एकूण संख्या | |
| २. | सर्व मतदान केंद्रांना भेटी देण्याचा कालावधी | .......... पासून ........ पर्यंत |
| ३. | भेटी दिलेल्या मतदान केंद्रांची एकूण संख्या | |
| ४. | संवेदनशील मतदान केंद्रांची संख्या | |
| ५. | एकत्रित सर्व मतदान केंद्रातील संवेदनशील मतदार म्हणून निश्चित केलेल्या कुटुंबाची एकूण संख्या | |
| ६. | एकत्रित सर्व मतदान केंद्रातील संवेदनशील मतदार म्हणून निश्चित केलेल्या मतदारांची एकूण संख्या | |
| ७. | सर्व मतदान केंद्रातील ओळखण्यात येणाऱ्या संवेदनशीलतेस कारणीभूत असणाऱ्या व्यक्तीची एकूण संख्या. | |

क्षेत्र अधिकाऱ्याची/क्षेत्रीय दंडाधिकाऱ्याची स्वाक्षरी .........................

क्षेत्र अधिकाऱ्याचे/क्षेत्रीय दंडाधिकाऱ्याचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक ............................

(शा. म. मु.) वाय १९१८-५ (७३५०-११-२०२३)

## जोडपत्र–४

## अतिसंवेदनशील मतदान केंद्रांची निश्चिती करण्यासाठी वस्तुनिष्ठ निकष

(एक) संवेदनशील क्षेत्रखंड असलेली मतदान केंद्रे आणि निश्चित केलेल्या संवेदनशील क्षेत्रात असलेली मतदान केंद्रे.

(दोन) ९० टक्क्यांहून अधिक मतदान झाले आहे आणि मागील निवडणुकीमध्ये एकाच उमेदवारास ७५ टक्क्यांहून अधिक मतांचे झालेले आहे, अशी मतदान केंद्रे.

(तीन) १० टक्क्यांहून कमी मतदान झाले आहे, अशी मतदान केंद्रे.

(चार) मागील पाच वर्षात लोकसभेच्या किंवा राज्य विधानसभेच्या कोणत्याही निवडणुकी दरम्यान, मतदान प्रक्रियेचे उल्लंघन करणे आणि मतदान बुथ ताब्यात घेणे यांसारख्या निवडणुकविषयक अपराधांमुळे पुनर्मतदान घ्यावे लागले होते अशी मतदान केंद्रे.

(पाच) मागील पाच वर्षात लोकसभेच्या किंवा राज्य विधानसभेच्या कोणत्याही निवडणुकी दरम्यान, मतदानाच्या दिवशी कोणत्याही प्रकारच्या हिंसक घटनेमुळे प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात आला होता, अशी मतदान केंद्रे.

(सहा) मतदारसंघाच्या या सरासरी टक्केवारीपेक्षा, अनुपस्थित, स्थलांतरित आणि मयत मतदार यांची अधिक सरासरी टक्केवारी असलेली मतदान केंद्रे (संदर्भ : अनुपस्थित, स्थलांतरित आणि मयत मतदारांच्या मतदार संघाची सरासरी % = मतदारासंघातील अनुपस्थित, स्थलांतरित आणि मयत मतदारांची एकूण संख्या/एकूण मतदान केंद्रांची संख्या).

(सात) कोणत्याही विशिष्ट क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्थेच्या असाधारण स्थितीशी संबंधित माहिती.

## जोडपत्र–५

### प्रमाणपत्र

### क्षेत्र अधिकारी/क्षेत्रीय दंडाधिकारी इत्यादीसाठी

**(क) निवडणुकीचे नाव** ..........................................................................................................

**(ख) संसदीय/विधानसभा मतदारसंघाचा क्रमांक व नाव** ..........................................................................

**(ग) संसदीय मतदारसंघाचा क्रमांक व नाव** ..........................................................................................
**(संसदीय मतदारसंघ असल्यास)**

**(क) क्षेत्र अधिकाऱ्याचे/क्षेत्रिय दंडाधिकाऱ्याचे नाव** ..........................................................................

**(ख) भ्रमणध्वनी क्रमांक** .....................................................................

**(ग) नेमून दिलेल्या मतदान केंद्रांची संख्या** ..................................................

**(घ) राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपॅट जमा करण्याचा दिनांक व वेळ** ..............................................

**(ङ) देण्यात आलेली राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपॅट यांचा तपशील** ....................................

| अ.क्र.<br>(१) | मतदान युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक<br>(२) | नियंत्रण युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक<br>(३) | व्हीव्हीपॅटचा विशिष्ट ओळख क्रमांक<br>(४) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

(मतदानाच्या दिवशी माहिती भरावी.)

**(क) मतदानाच्या दिवशी अभिरूप मतदानाच्या वेळी**

| अ.क्र. | मतदान केंद्राचा क्रमांक व नाव | मतदान केंद्रावर बदलण्यात आलेल्या युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक | | | मतदान केंद्रावर पुरविण्यात आलेल्या युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक | | | मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मतदान युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक | नियंत्रण युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक | व्हीव्हीपॅटचा विशिष्ट ओळख क्रमांक | मतदान युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक | नियंत्रण युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक | व्हीव्हीपॅटचा विशिष्ट ओळख क्रमांक | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**(ख) मतदानाच्या दिवशी प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी**

| अ.क्र. | मतदान केंद्राचा क्रमांक व नाव | मतदान केंद्रावर बदलण्यात आलेल्या युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक | | | मतदान केंद्रावर पुरविण्यात आलेल्या युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक | | | मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मतदान युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक | नियंत्रण युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक | व्हीव्हीपॅटचा विशिष्ट ओळख क्रमांक | मतदान युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक | नियंत्रण युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक | व्हीव्हीपॅटचा विशिष्ट ओळख क्रमांक | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**(ग) प्राप्ती केंद्रांवर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपॅट जमा करतेवेळी**

(एक) राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपॅट जमा करण्याचा दिनांक व वेळ ..........................

(दोन) प्राप्ती केंद्रांवर जमा करण्यात आलेली, वापर न झालेली/कार्यान्वित न झालेली, वापरण्यात न आलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपॅट यांचे तपशील .............................

| अ.क्र. (१) | मतदान युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक (२) | नियंत्रण युनिटचा विशिष्ट ओळख क्रमांक (३) | व्हीव्हीपॅटचा विशिष्ट ओळख क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

वरील माहिती बरोबर आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

क्षेत्र अधिकाऱ्याचे नाव

पदनाम

प्रमाणित करण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे वापरण्यात न आलेली/कार्यान्वित न झालेली, न वापरलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपॅट क्षेत्र अधिकारी (नाव) यांच्यामार्फत माझ्याकडे जमा करण्यात आली आहेत.

(स्वाक्षरी)

## जोडपत्र–६

### क्षेत्र अधिकाऱ्याच्या अहवालाचे प्रपत्र (मतदानाच्या दिवशी)

क्षेत्र अधिकाऱ्याचे नाव :

विधानसभा मतदारसंघाचा क्रमांक व नाव :

मार्ग क्रमांक :

उमेदवारांची संख्या :

| | |
|---|---|
| १ | मतदान केंद्राचा क्रमांक व नाव |
| २ | केंद्रीय सुरक्षा बल तैनात करण्यात आले आहे का ? होय/नाही |
| ३ | सुक्ष्म निरीक्षकाची नियुक्ती केली आहे का ? होय/नाही |
| ४ | व्हीडीओ कॅमेरा बसवला आहे का ? होय/नाही |
| ५ | एकूण मतदार |
| ६ | अभिरूप मतदान घेतले आहे का किंवा कसे ? (होय/नाही) |
| ७ | उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींची संख्या |
| ८ | ज्यांचे प्रतिनिधित्व मतदान प्रतिनिधीने केलेले नाही असे पक्षाचे उमेदवार |
| ९ | पहिल्या भेटीच्या वेळी (वेळ नमूद करा) मतदान झालेल्या मतांची संख्या |
| १० | दुसऱ्या भेटीच्या वेळी (वेळ नमूद करा) मतदान झालेल्या मतांची संख्या |
| ११ | तिसऱ्या भेटीच्या वेळी (वेळ नमूद करा) मतदान झालेल्या मतांची संख्या |
| १२ | संवेदनशील मतदार निश्चित करण्यात आले आहेत काय किंवा कसे ? निश्चित करण्यात आले असल्यास त्यांना मतदानासाठी केंव्हा घेण्यात आले ? |
| १३ | मतदान बंद करण्याच्या वेळेनंतर मतदान सुरू होते काय ? (होय/नाही) |
| १४ | सायंकाळी ५.०० वा. नंतर टोकन घेऊन मतदान केलेल्या मतदारांची संख्या |
| १५ | मतदान बंद करतेवेळी मतदान झालेल्या एकूण मतांची संख्या |
| १६ | मतदान झालेल्या मतांची एकूण टक्केवारी |
| १७ | यंत्रे यथोचितपणे बंद आणि मोहोरबंद केली आहेत काय ? (होय/नाही) |
| १८ | मतदान केंद्राध्यक्षाने मतदान प्रतिनिधीना नमूना १७ सी ची प्रत दिली आहे का ? (होय/नाही) |
| १९ | मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी, १७ए, १७ सी तपासणी पडताळणी केली आहे काय ? (होय/नाही) |
| २० | मतदानाच्या दिवशी प्राप्त झालेल्या तक्रारी |
| २१ | प्रत्येक तक्रारीचा स्त्रोत, तिचे स्वरूप आणि पाठपुरावा करून केलेली कार्यवाही. |
| २२ | पुनर्मतदान घेण्याची शिफारस करण्यात आली आहे काय ? (होय/नाही) |
| २३ | यंत्रे आणि सांविधिक कागदपत्रे सुरक्षित कक्षामध्ये जमा करण्यात आली आहेत काय ? (होय/नाही) |
| २४ | आंतरजाल प्रक्षेपण करण्यात आले होते काय ? (होय/नाही) |

**क्षेत्र अधिकाऱ्याच्या क्षेत्रातील (विधानसभा मतदारसंघ) विविध फेऱ्यांच्या अहवालाचा नमुना**

## जोडपत्र—सात

**क्षेत्रांचे नाव किंवा क्रमांक :** **क्षेत्र अधिकाऱ्याचे नाव :**

| अनुक्रमांक | पायाभूत सुविधा (होय/नाही/अहवाल) | | | | | | | | | | फेरीमध्ये तुम्ही मतदान केंद्रस्तरिय अधिकाऱ्यास सोबत घेतले होते काय? (होय/नाही) | असुरक्षिततेचे मापन | मतदान केंद्रातील कोणतेही विशेष निरीक्षण, गाव व पाणलोट क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भेट दिलेल्या मतदान केंद्राचा क्रमांक व नाव | रॅम्प | जाण्या येण्याचा रस्ता | पाण्याची व्यवस्था | सावलीची व्यवस्था | स्वतंत्र स्वच्छतागृहे | वीज जोडणी आणि प्लग पॉईंट | फर्निचर | तळ मजल्यावरील मतदान केंद्र | मतदारांची संख्या | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १ | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | | | |
| ११ | | | | | | | | | | | | | |
| १२ | | | | | | | | | | | | | |
| १३ | | | | | | | | | | | | | |
| १४ | | | | | | | | | | | | | |
| १५ | | | | | | | | | | | | | |

शेरा

क्षेत्र अधिकाऱ्याची स्वाक्षरी :

भेट दिल्याचा दिनांक :

**जोडपत्र—आठ**

**असुरक्षित घरांची/कुटुंबाची यादी :**

| अ.क्र. (१) | स्थानिक ठिकाणी असलेल्या असुरक्षित मतदारांचा घर क्रमांक/कुटुंबाचे नाव/कुटुंबाची/कुटुंबातील सदस्यांची ओळख निश्चित करणारे इतर तपशील (२) | स्तंभ-२ मध्ये निश्चित केलेल्या घरातील/कुटुंबातील असुरक्षित म्हणून निश्चित केलेल्या मतदारांची संख्या (३) | कुटुंबातील सदस्यांचा संपर्क क्रमांक कोणताही असल्यास (४) | केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही (५) | शेरा (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| एकूण | | | | | |

**क. मतदारांना धाकदपटशा दाखवणाऱ्या त्यांच्यावर गैरवाजवी दडपण आणणाऱ्या ज्यांचा शोध घ्यावयाचा आहे/त्यांना प्रतिबंध करावयाचा आहे अशा, व्यक्तींची यादी.**

| अ.क्र. (१) | व्यक्तींचे नाव (२) | व्यक्तींचा संपर्क क्रमांक/पत्ता (३) | केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| एकूण | | | | |